
बुधवार, १ मार्च २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१८४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 01 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-184 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5


# जी-20 (W-20) शिष्टमंडळ भारावले



जागतिक वारसा स्थळ असलेल्या वेरूळ लेणी येथे जी-20 (W-20) शिष्टमंडळाने भेट दिली. लेण्यांची पाहणी करत कैलास मंदिर आणि कोरलेल्या विविध लेण्या, कलाकुसर आदींचे कौतुकही शिष्टमंडळाने केले. तसेच वेरूळ लेण्या पाहून शिष्टमंडळाच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. शिष्टमंडळाचे पारंपरिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. पाहणी दरम्यान विविध देशांच्या प्रतिनिधींना त्यांच्या भाषेत वेरूळ लेणीबाबत सविस्तर माहिती गाईड यांनी दिली. माहिती ऐकून व कलेची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर तत्कालीन कलाकृती निर्मितीबद्दल आश्चर्यही शिष्टमंडळाने व्यक्त केले. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया, अपर जिल्हाधिकारी डॉ. अनंत गव्हाणे, जिल्हा प्रशासन, पुरातत्त्व विभागाचे वरिष्ठ अधिकारी आदींचीही यावेळी उपस्थिती होती.

# पत्रकारांवरचा हल्ला हा लोकशाहीवरील हल्ला

## अजित पवार : वारिशे हत्येचा तपास निष्पक्षपणे करा

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई : राज्यात रिफायनरी विरोधात लिखाण केले म्हणून कोकणातील पत्रकार शशिकांत वारिशे यांची हत्या करण्यात आली, ही पुरोगामी महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी घटना आहे. वारिशे यांची हत्या करणारा संशयित आरोपी हा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री महोदयांचे फोटो वापरुन रिफायनरीचे समर्थन करत होता. ही गंभीर बाब आहे. पत्रकार वारिशे यांच्या हत्येची नि:पक्षपणे चौकशी करावी, पोलीसांना तपासात 'फ्री हॅण्ड' देण्यात यावा, तपासात कोणताही राजकीय हस्तक्षेप होणार नाही याची काळजी घ्यावी. राज्यात पत्रकारांवर झालेला हल्ला हा लोकशाहीवरचा हल्ला असून पत्रकार वारिशे यांच्या हत्येच्या मागचा मास्टरमाईंड शोधण्याची मागणी विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सभागृहात केली.**

कोकणात रिफायनरी विरोधात लिखाण करणारे पत्रकार शशिकांत वारिशे यांच्या गाडीला अपघात करुन त्यांना फरफटत नेले. पुरोगामी महाराष्ट्राला काळीमा फासणारी ही घटना आहे. या हत्येतील संशयित आरोपी हा रिफायनरीचा समर्थक आहे. त्याने राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री महोदयांचे फोटो वापरुन रिफायनरीच्या जाहिराती केल्या आहेत. मुख्यमंत्र्यांचा फोटो वापरला आहे त्यामुळे त्यांच्या संबंधित कोण आहे का? याचा तपास व्हावा माझा आरोप नाही मात्र ही बाब अत्यंत गंभीर आहे असेही अजित पवार म्हणाले.

विरोधी लिहितो म्हणून पत्रकाराची हत्या करणे हा लोकशाहीवरचा हल्ला आहे, महाराष्ट्राची मान खाली घालायला लावणारी घटना आहे. या प्रकरणाची सखोल तपासणी करुन यामागच्या मास्टरमाईंडचा शोध घेण्याची आक्रमक मागणी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केली.

# आरोग्य केंद्राची दुरवस्था बघून संभाजीराजे संतापले

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** माजी खासदार छत्रपती संभाजीराजे यांनी मंगळवारी धाराशिव दौऱ्यावर असताना एका आरोग्य केंद्राची पाहणी केली. यावेळी या केंद्राची दुरावस्था बघून संभाजीराजे चांगलेच संतापले. राज्याच्या आरोग्यमंत्र्यांच्याच मतदारसंघातील आरोग्य केंद्राची वाईट अवस्था बघून त्यांनी शिंदे सरकारवर जोरदार टीकास्त्र सोडले. राज्यातील आरोग्यकेंद्रे जर सुसज्य होणार नसतील, तर आम्ही वेळोवेळी आंदोलने करू. याच उद्देशाने आम्ही स्वराज्य संघटनेची स्थापना केली आहे. माझी राज्य सरकारला इशारा देतो, की त्यांनी लवकरात लवकर या आरोग्य केंद्रांची सुधारणा करावी. आरोग्य केंद्र हे सामान्य माणसाच्या हक्काचे आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया संभाजीराजेंनी दिली.

# फसवणूक प्रकरणी वनक्षेत्रपाल निलंबित

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** वाळवा तालुक्यातील पोखर्णी येथे पूनर्वसित झोळंबी वसाहतीमधील जमीन सपाटीकरण कामात बनावट शिक्के व स्वाक्षऱ्या करून वरिष्ठांची फसवणूक केल्या प्रकरणी शिराळा येथील वनक्षेत्रपाल सचिन जाधव यांना निलंबित करण्यात आले. संभाजी ब्रिगेडचे राज्य संघटक सुयोग औंधकर यांनी याबाबत तक्रार केली होती. या तक्रारीच्या चौकशीनंतर ही कारवाई करण्यात आली आहे. वनक्षेत्रपाल जाधव यांनी पोखर्णी येथील जमिन सपाटीकरणासाठी सुमारे ५८ लाख रूपयांची बनावट कामे करून निधी हडपण्याचा डाव औंधकर यांनी माहिती अधिकारामध्ये उघडकीस आणला होता. या कामाची अंदाजपत्रके तयार करून तांत्रिम मान्यता वारणा कालवे विभागाकडून घेणे आवश्यक होते. जाधव यांनी उप अभियंत्यांची मान्यता असलेले पत्र बनावट शिक्का व स्वाक्षरी करून अंदाजपत्रकासोबत जोडले होते. ही बाब माहिती अधिकारामध्ये स्पष्ट झाली.


आपल्या स्वप्नपुर्तीसाठी,
आपुलकीचा हातभार...



IFFCO-TOKIO GENERAL INSURANCE
Muskurate Raho

आमचा संकल्प
सर्वसामान्यांपर्यंत
विमा पोहोंचविणे...

वार्षिक रु.760/- रुपयांची विमा पॉलिसी
रु.760/- भरा व अनेक फायदे मिळवा
इन्शुरन्सचे फायदे
- अपघाती मृत्यू झाल्यास रु.7.5 लाख मिळणार
- मेडीकल बील रु.1.50 लाख मिळणार

वयोमर्यादा - ०५ वर्षा पासून ते ६५ वर्षापर्यंत

वार्षिक रु.310/- रुपयांची विमा पॉलिसी
रु.310/- भरा व अनेक फायदे मिळवा
इन्शुरन्सचे फायदे
- अपघाती मृत्यू झाल्यास रु.4 लाख मिळणार
- शरीरातील एखादा अवयव निकामी झाल्यास रु.2 लाख मिळणार
- शरीरातील दोन किंवा दोन पेक्षा जास्त अवयव निकामी झाल्यास रु.4 लाख मिळणार व मेडीकल बील रु.1 लाख
- ही पॉलिसी ज्या तारखेपासून घेतलेली आहे त्या दिवसापासून लागू होई

वयोमर्यादा - ०५ वर्षा पासून ते ६५ वर्षापर्यंत.


वार्षिक रु.50/- रुपयांची विमा पॉलिसी
रु.50/- भरा व अनेक फायदे मिळवा
इन्शुरन्सचे फायदे
- अपघाती मृत्यू झाल्यास रु.1 लाख मिळणार
- शरीरातील एखादा अवयव निकामी झाल्यास रु.50 हजार मिळणार
- शरीरातील दोन किंवा दोन पेक्षा जास्त अवयव निकामी झाल्यास रु.1 लाख मिळणार.
- ही पॉलिसी ज्या तारखेपासून घेतलेली आहे त्या दिवसापासून लागू होईल.

वयोमर्यादा - ०५ वर्षा पासून ते ६५ वर्षापर्यंत.
सदरील पॉलिसी मुफ्तमध्ये काढुन मिळेल.

राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सोसा लि., परळी वैजनाथ
• बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स

●मुख्य कार्यालय : मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि.बीड मो.९१३००७२१७८/९१३००७२१८८
●कॉर्पोरेट ऑफिस : २०५/२०६, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड शाखा, आकाशवाणी, औरंगाबाद, मो.९१३००७२१७६

Toll Free No : 1800 419 7501 Web : www.rajasthanimultistate.in help@rajasthanimultistate.com




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




# माती भिडली आभाळा

आधुनिक केसरी

अशी ही तेराव्या शतकात लिहिलेली ज्ञानेश्वरी. काळाच्या ओघात ते करवीरेश्वराचे मंदिर नष्ट झाले पण माऊलींनी ज्या खांबाला टेकून ज्ञानेश्वरी सांगितली, तो खांब मात्र तसाच राहिला. त्या खांबानं जणू आभाळ पेललं. आभाळ पेलण्याइतका तो उंच झाला. माऊलींनी त्याला टेकून ज्ञानेश्वरी सांगितली. ज्ञानेश्वर म्हणजे आभाळच. ज्ञानेश्वरी म्हणजे सुद्धा आभाळ. इथला खांब हा पृथ्वीवरल्या मातीचेच प्रतीक. पण ही माती ज्ञानदेवांच्या पावन स्पर्शाने एवढी पुनीत, एवढी विशाल झाली की ती आभाळाला भिडली. म्हणून मला शांताबाईंच्या ' अजब सोहळा, माती भिडली आभाळा ' या गाण्याच्या ओळी आठवल्या. तो खांब तरी किती भाग्यवान म्हणायचा ! अखिल विश्वाला वंदनीय असलेल्या ज्ञानेश्वर माऊलींनी त्याचा आधार घेतला. तो त्यांच्या स्पर्शानं पावन झाला. आपली कठोरता त्यानं त्यागली आणि माऊलींच्या व्यक्तिमत्वातली शीतलता, पावित्र्य धारण केलं. महाराष्ट्र ही संतांची भूमी. इथल्या मातीचा कण न कण त्यांच्या पदस्पर्शाने पावन झाला आहे. इथल्या शिळा सुद्धा पवित्र आहेत. उगीच नाही गोविंदाग्रजांनी उगीच नाही

**मंगल देशा पवित्र देशा महाराष्ट्र देशा**
**प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा**
**राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा**
**नाजूक देशा, कोमल देशा, फुलांच्याही देशा**

असे सुंदर महाराष्ट्राचे वर्णन केले ! इथले दगडही पावन आहेत. हा खांब तर एवढा पवित्र की पुढे त्याच्याभोवती मंदिर उभारले गेले. एरव्ही मंदिरात खांब असतात, पण खांबासाठी मंदिर उभारले जावे हा ही एक ' अजब सोहळा '. त्याचं कारणच तसं आहे. ज्या ज्ञानेश्वरांची पाठ समाधीस्थानीही जमिनीला टेकली नाही, त्याची पाठ या खांबाला टेकली. प्रख्यात लेखिका दुर्गा भागवत आपल्या ' पैस ' या पुस्तकात त्याबद्दल बोलताना म्हणतात,



## आनंदी पहाट

# देखल्या देवाला दंडवत

आधुनिक केसरी

देखल्या देवाला दंडवत घालणारे संख्येनं खूपच कमी असतात, हे विधान किती जण मान्य करतील ? त्या विधानाशी कितीजण सहमत असतील ? आम्ही देखल्या देवाला दंडवत घालत नाही, आम्ही देवाला मनोभावे नमस्कार करतो, असं म्हणणारे किती असतील ? अनेकदा आपल्याला रस्त्यावरून वाहनातून, वाहनावरून अथवा पायी जाणाऱ्या व्यक्तीच्या देवळातील देवाला नमस्कार करण्याच्या तऱ्हा बघितल्या कि आश्चर्य वाटायला लागतं. ती व्यक्ती देवाला नमस्कार करताना नक्की काय करत आहे, ह्याचा थांग पत्ता लागत नाही. अशा व्यक्ती देव मानतात



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

म्हणून नमस्कार करत असतात, कि आपण नमस्कार करताना कोणी बघून काही म्हणणार तर नाही ना, ह्या दडपणाखाली तो नमस्कार उरकत असतात ? तो द्राविड प्राणायाम कशासाठी करायचा असतो ? त्याबाबतीत हेच काही कळत नाही. काही जणांच्या बाबतीत मात्र चित्र उलटं असल्याचं दिसून येतं. त्यांचा इतका देव देव सुरु असतो, कि काही वेळा असं वाटतं ही मंडळी त्याशिवाय दुसरं काही करत असतील कि नाही अशीच शंका येऊ लागते. ह्या मंडळींना देवळातल्या देवामध्ये जाज्वल्य शोधावं असं वाटत असतं पण घरातल्या देवतुल्य ऋषितुल्य कौटुंबिक सदस्यांमध्ये दिसू शकत नाही. अशी मंडळी देऊळ बांधून, त्यांत मूर्ती बसवून त्यात देवत्व शोधायचा केविलवाणा प्रयत्न करत असतात. पण घरातल्या जिवंत, चालत्याबोलत्या देवाला मात्र वृद्धाश्रमात दाखल करतात. का बरं असं होत असतं ? घरातल्या वयोवृद्ध व्यक्तीमध्ये देवत्वाचा चमत्कार दिसत नाही, कि तसा कोणताही त्यांच्याकडून दाखला मिळत नाही, म्हणून त्यांची वृद्धाश्रमात रवानगी केली जाते.



आधुनिक केसरी

**सत्कर्मात डोले | पांडुरंग ||**

पातकी मनाची | साथ अधर्माला ||
जाग स्वधर्माला | कैसी येई ? ||१||
दान-धर्मासाठी | नाही आला पुढे ||
तुझ्या गाठी पडे | पुण्य कैसे ? ||२||
हरिनाम कधी | नाही आले मुखी ||
कैसा होशी सुखी | संसारात ? ||३||
दुर्जनांचा संग | घडे रात्रंदिन ||
त्याची कैसी दैना | फिटेल रे ? ||४||
सावध हो मना | सोड वृथा संग ||
जाण अंतरंग | भजनाचे ||५||
पुण्याईचा मळा | हरिनामी फुले ||
सत्कर्मात डोले | पांडुरंग ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी

|| श्रीललिताम्बिकावंदनम् ||
रचना: © चंद्रहासशास्त्री सोनपेठकर
कुसुमाकरशोभां त्वाम् आह्लादिनीं प्रमोदिनीम्।
मानसधारिणीं देवीं वन्दे मनोविनोदिनीम् ।।
वसंत ऋतूची शोभा, आह्लाद आणि आनंद निर्माण करणारी,मनाला धारण करणारी, मनाला आनंदित करणारी अशा देवीला तुला मी वंदन करतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**माया विश्व यशस्वनी, शासक विश्व महान । वेद वीत्त वर साधक, आय निरा अभिमान ।।३०।।(स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/३०**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

जिचं यश आणि महत्त्व समस्त विश्वामध्ये फैलावलेलं आहे, ती यशस्विनी माया, महान विश्वावर आपलं शासन करते. मोठमोठे वेदवेत्ता तसेच साधकांचाही अभिमान तिच्या समोर येताच गळून पडतो. हीच प्रचंड मायेची महिमा आहे, जीच्याकडे बघून संसार विमोहित होत आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी

बाल्यावस्थेत आई,आजी,आपलं संगोपन करणारे सर्व जण आपल्याला टाळ्या वाजवून खुळखुळा वाजवून रमवत असतात,आपण ते ऐकून प्रतिसाद देतो हसतो काही वेळा रडतो देखील आणि हीच आपली श्रवणभक्तिची पहिली पायरी आहे असं म्हणलं तर वावगे ठरणार नाही. वय वाढतं तसं "एक पाय नाचवं रे गोविंदा"असं म्हणून खेळवलं जातं मुलं जसजसं मोठ होत जातं तसतसं त्याला शुभंकरोती, परवचा,मनाचे श्लोक,पसायदान गीतेचे अध्याय,नाथांची भारूडे,तुकारामांच्या गोष्टी सांगितल्या जातात. आपल्या संत साहित्याची ओळखं खरं तर या बाल्यावस्थेत होते. आणि लहानपणी जे तुमच्या वर संस्कार होतात. ते पुढे जन्मभर उपयोगी पडतात. भगवंत भक्तीचा आरंभ अशाप्रकारे श्रवणाने होत असल्याने प्रव्रुत्ति किंवा प्रपंच असो,निव्रुत्ति किंवा परमार्थ असो दोन्ही कडे श्रवणाखेरीज आयुष्यात सफलता नाही असा द्रुढ समज जसजसे मोठे होत जातो तसतसा होत जातो. कोणाकडून तरी ऐकल्यावांचून आपल्याला कळत नाही हे मानवीमनाचे शास्त्र सर्व मान्य झाल्याने मानवी प्रयत्नाचे मुळ श्रवण आहे हे मान्य होते. श्रवण नसेल तर सगळीकडे अज्ञानाचा बाजार सोकावला जातो. मी म्हणतो तेच खरं अशी मोठेपणाची झालर आपले आपणचं घालून घेतली जाते. पण जेव्हा काही दगाफटका बसतो तेव्हाचं शहाणपणं येते. असा दगा फटका बसु नये याकरता श्रवणभक्तिने जीवनाची सफलता करून घ्यावी.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी


तुका म्हणे सेवे । माझे संकल्प वेचावे ॥३॥
सदा तळमळ । चित्ताचिये हळहळ ॥१॥
त्याचें दर्शन न व्हावें । शव असतां तो जिवे ॥ध्रु.॥
कुशब्दाची घाणी । अमंगळविली वाणी ॥२॥

# भगवंताचे अनुसंधान कसे ठेवावे ?

आधुनिक केसरी

ज्या गोष्टीचे अत्यंत प्रेम आहे तिचे अनुसंधान मनुष्याला आपोआपच राहते. ते इतके टिकते की ते अनुसंधान मला आहे ही जाणीवही राहात नाही. 'अनुसंधान ठेवतो' असे म्हणताना 'मी' त्याच्याहून वेगळा असतो; आणि प्रेमाचे जे अनुसंधान असते तिथे मी एकजीवच होतो. आपण कितीही गडबडीत असलो तरी वाटेने जात असताना आपल्या नावाने कुणी हाक मारली की आपण वळून पाहतो. हे आपले अनुसंधान आहे; कारण या देहावर आपले इतके प्रेम आहे की मी त्याच्याहून वेगळा नाहीच ! असे देहाचे अनुसंधान कसे ठेवावे हे सांगावे लागत नाही. 'देहाचा विसर पाडा' म्हणून सांगावे लागते, 'देहाचे स्मरण ठेवा' म्हणून नाही सांगावे लागत !

आम्हाला भगवंताचे अनुसंधान ठेवायचे आहे. हा एक प्रकारचा अभ्यास आहे. भगवंताचे प्रेम वाढले तर अनुसंधान टिकेल. परिक्षा पास होण्याकरिता जसा अभ्यास करावा लागतो तसा भगवंताचे प्रेम वाढविण्याकरिता अभ्यास करणे जरूर आहे. यासाठी, जे जे काही मी करीन ते ते मी भगवंताच्या साक्षित्वाने करतो आहे ही जाणीव ठेवून करायला पाहिजे. आज आम्हांला नाना तऱ्हेचे उद्योग करावे लागतात. प्रपंच म्हटला म्हणजे किती गोष्टी कराव्या लागतात ! त्या सगळ्या करीत असताना भगवंताचे स्मरण ठेवून करणे,



हे आपले खरे कर्तव्य आहे. सर्कशीमध्ये आपण पाहतो ना ! वाघ, सिंह, घोडे, हत्ती जे काय प्राणी असतील ते खेळ खेळतात. घोडा कसा सुंदर नाचतो असे आपण म्हणतो ! पण त्या घोड्याचे लक्ष प्रेक्षकांकडे नसते. त्या घोड्याचे, त्या वाघाचे, त्या सिंहाचे लक्ष आतमध्ये चाबूक उगारणारा जो मनुष्य असतो त्याच्याकडे असते ना ? प्रेक्षक काय म्हणतील ते तो प्राणी पाहात नाही. आणि आपण काय करतो ? भगवंत काय म्हणेल हे पाहातच नाही, जग काय म्हणेल ते पाहतो ! हे जर आम्ही सोडले ना, तर भगवंताला काय हवे आहे ते आम्हाला बरोबर कळेल. भगवंताचे स्मरण ठेवून कर्म केल्याने त्याला काय हवे तेच आमच्या हातून घडेल. त्याचे संधान न सोडता कर्म करणे हे अनुसंधानाचे लक्षण आहे. हे कशाने होईल ? अत्यंत प्रेमाने होईलच. एक बाई नुकतीच बाळंत होऊन सासरी आल्यावर तिने मूल पाळण्यात निजविले, आणि मागच्या परसामध्ये ती भांडी घाशीत होती. ते मूल थोडेसे कुठे रडले, घरात पुष्कळ माणसे होती, कुणाला ऐकू नाही गेले. ती पोरगी मात्र धावत पाळण्यापाशी आली, आणि 'मूल उठलेले दिसते आहे' असे म्हणाली. काम करताना तिचे कान जसे पाळण्याकडे होते, तसे प्रपंच करताना आपले लक्ष मात्र भगवंताकडे असले पाहिजे. याचे नाव अनुसंधान !

**आजचे बोधवचन आहे**

**अखंड मुखी रामनाम, आत असावे अनुसंधान, देहाने करावे प्रपंचाचे काम.**

## आधुनिक केसरीचे वाचक लिहितात
# लेख वाचनीय, विचार अनुकरणीय

आधुनिक केसरी न्यूज



दै. आधुनिक केसरी हे एक चांगले वृत्तपत्र ऑनलाईन पद्धतीने आमच्या वाचनात येते. या वृत्तपत्रातील अनेक लेख हे दर्जेदार माहिती देणारे असतात. विशेषतः डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांचे निरूपण हे सदर आणि प्रकाशित होणारे लेख इतके सुंदर असतात की, अनेकदा आम्ही त्यांचे सामुहिक वाचन करतो. निरूपण सदरात कधी संस्कृत श्लोक आणि मराठी अर्थ असतात. तर कधी मराठी भाषेतून विचार व्यक्त केलेले असतात. शास्त्रीजींचे हे निरूपण वाचनीय तर असतेच पण त्याच बरोबर ते विचार अनुकरणीय आणि संस्करणीय देखील असतात. ***धन्यवाद दै. आधुनिक केसरी!***

**सौ. आर. एस. पांडे, पुणे**






# दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनातील भाषा, प्रांतवाद्यांसह असंतुष्ट राजकारण्यांनी उगवला पूर्णेकरांवर सूड !

## कोट्यवधीच्या संपत्तीची अक्षरशः धूळधाण : साडेतीन दशकांपूर्वी होती मराठवाड्यातील सर्वात मोठे जंक्शन म्हणून पूर्णेची ओळख

आधुनिक केसरी न्यूज

**चौधरी दिनेश**

**पुर्णा :** निजाम व ब्रिटिश काळापासूनच संपूर्ण मराठवाड्यात अत्यंत महत्वाचे रेल्वे जंक्शन व पुलींग पॉईंट म्हणून व एकेकाळी मसाल्याची सर्वात मोठी व्यापारपेठ म्हणून स्वतंत्र ओळख असलेल्या पुर्णा रेल्वे जंक्शनची अवस्था अवघ्या साडेतीन चार दशकाच्या कालावधीतच पुसली जाऊन संपूर्ण मराठवाड्यातील अविकसित व भकास रेल्वे स्थानक म्हणून नावारुपाला येईल अशी पुसटही कल्पना पुर्णेकरांच्या मनात आली नसेल...सर्वात महत्वाचे व सर्वात मोठे रेल्वे जंक्शन ज्या ठिकाणी हजारो रेल्वे कर्मचारी दिवसरात्र काम करीत होते त्यामुळे व्यापारपेठ अक्षरशः गजबजलेली दिसायची परंतु राजकीय क्षेत्रातील असंतुष्ट आत्म्यांसह दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनात कार्यरत भाषावाद/प्रांतवादाला प्राधान्य देणाऱ्या महाराष्ट्र/मराठी भाषीक द्वेष्ट्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची वक्रदृष्टी या सर्वात सधन असलेल्या पुर्णा जंक्शन वरील वैभवावर पडल्यामूळे 'गिधाडाने जसे मृत जनावरांच्या शरीराचे लचके तोडावे त्या पध्दतीनेच जणूकाही या मनुष्यरुपी गिधाडांनी येथील वैभवाचे लचके तोडण्यास सुरुवात केली असे म्हणणे यत्किंचितही चुकीचे ठरणार नाही.

**राजकीय मतभेदानेच केले पुर्णेच्या सर्वांगीन विकासाच्या नावेला अक्षरशः असंख्य छेद :** तत्कालीन राज्यकर्ते/राजकीय लोकप्रतिनिधी/राजकीय पक्ष पदाधिकारी यांच्यातील अंतर्गत गटबाजीसह पक्षभेद व दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनातील भाषाभेद/प्रांतभेदाला खतपाणी घालणारे अधिकारी/कर्मचारी यांच्यासह कामगार संघटना सोईस्कररित्या पुर्णा रेल्वे जंक्शनची वाट लावत असतांना मात्र मागील तिन/साडेतील दशकापासून जनसामान्यांच्या मतांवर निवडून येणारे लोकप्रतिनिधी/तथाकथित समाजसेवक/व्यापारी संघटनांचे पदाधिकारी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी कुंभकर्णी झोपेत होते की काय ? असा प्रश्न सर्वसामान्य जनते समोर अक्षरशः शेषनागा प्रमाणे फना काढून उभा टाकला असतांना या अत्यंत महत्वपुर्ण महत्वपुर्ण प्रश्नाचे उत्तर शोधण्याची यत्किंचितही ऐपत देखील नसलेले संधीसाधू लोक आज विकासाच्या नावावर तरुण पिढीला भरकटवण्याचा प्रयत्न करतांना पाहावयास मिळत आहे.


**पुर्णेच्या हक्काचे विभागीय व्यवस्थापक कार्यालयांसह असंख्य महत्वपुर्ण कार्यालय नांदेडला स्थलांतरीत :** सिकंद्राबाद रेल्वे रेल्वे डिवीजनचे दि.०१ एप्रिल २००३ रोजी विभाजन करण्यात येवून नांदेड/गुंटूर या दोन विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयांची स्थापना करण्यात आली यावेळी जाणीवपूर्वक पुर्णेत तब्बल १८० एक्कर जमीनीसह सर्व सुखसुविधा उपलब्ध असताना देखील पुर्णेच्या हक्काचे दक्षिण मध्य रेल्वेचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयाची नांदेडला स्थापना करण्यात आली अश्या प्रकारे सन एप्रिल २००३ पासून पुर्णेकरांवर सुरु झालेले सुडसत्र अद्यापही थांबलेले नाही दक्षिण मध्य रेल्वेचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय जरी नांदेडला स्थापन करण्यात आले तरी निदान उपविभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय पुर्णेत असायला हवे होते परंतु दमरे प्रशासनातील भाषा/प्रांतवादाची विषारी गरळ ओकणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांसह असंतुष्ठ राजकारण्यांनी दक्षिण मध्य रेल्वेचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय नांदेडला स्थापीत झाल्यानंतर पुर्णा जंक्शन स्थानकावरील रेल्वे लोको शेड वर्कशॉप, रेल्वे इंग्रजी/तेलगू/मराठी माध्यम शाळा, डिईएम ऑफिस, एईएन ऑफिस, आयओडब्ल्यू ऑफिस, पिडब्ल्यूडी ऑफिस, टिएक्सआर ऑफिस, क्रू बुकींग लॉबी, रेल्वे सुरक्षा बल पोलिस स्टेशन, लोहमार्ग रेल्वे पोलिस स्टेशन, टिटीई ऑफिस, रेल्वे रुग्नालय - १, एरिया ऑफिस मिनी डिआरएम ऑफिस, कंट्रोल ऑफिस, रेस्ट हाऊस रनिंग रुम, गुड्स शेड, २ पीट लाईन, मार्शल यार्ड, ब्रेक डाऊन कर्मचारी ऑफिस, ट्रेन लाईटींग स्टॉफ, ड्रायव्हर/ गार्ड रनिंग रुम आदी महत्वाची कार्यालय पुर्णेतून स्थलांतरीत केली जात असताना स्थानिक लोकप्रतिनिधींसह व्यापारी संघटना/सामाजिक संघटना/विविध राजकीय पक्ष पदाधिकारी कुंभकर्णी झोपेत होते की काय ? असा प्रश्न उपस्थित होणे साहजिकच म्हणावे लागेल...







**पुर्णेकरांच्या आंदोलना नंतर देखील क्यू-बुकींग लॉबोचे स्थलांतर थांबले नाही :** पुर्णा जंक्शन येथील ब्रिटिश/निजाम काळापासून असलेली रनिंग स्टॉफ एक्सप्रेस/पेसेंटर स्टॉफची क्यू-बुकींग लॉबीच्या स्थलांतराचा कुटील डाव दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनातील भाषा/प्रांतवाद्यांसह असंतुष्ट राजकारण्यांकडून आखला जात असल्याची कुणकूण लागताच पुर्णा शहरासह तालुक्यातील सर्वसामान्य जनता व्यापारी प्रतिष्ठित नागरिकांनी स्वयंस्फुर्तीने उठाव करीत रेल्वे प्रशासना विरोधात आंदोलन केले परंतु या आंदोलनाला न जुमानता तत्कालीन विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनी पुर्णा जंक्शन येथील क्यू-बुकींग लॉबीचे लचके तोडल्यागत विभाजन करीत एक्सप्रेस क्यू-बुकींग लॉबी नांदेडला स्थलांतरीत केली असाच एक गंभीर प्रकार दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनातील भाषा/प्रांतवादी अधिकाऱ्यांसह असंतुष्ट राजकारण्यांनी केल्याचे निदर्शनास येत असून पुर्णेत जागेसह सर्व प्रकारच्या सुविधा असतांना देखील इलेक्ट्रिक लोको टिन शेड नांदेड येथे पळवण्याचा गंभीर प्रकार घडला आहे दक्षिण मध्य रेल्वे प्रशासन व असंतुष्ट राजकारण्यांनी घेतलेला हा निर्णय बदलण्याची क्षमता परभणी जिल्ह्यातील ना लोकप्रतिनिधींमध्ये आहे नाही व्यापारी संघटनांमध्ये नाही सामाजिक संघटनांमध्ये आता मात्र तेलही गेले अन् तुपही गेले अन् हाती मात्र धुपाटने आले अशी एकंदर अवस्था आम्हा पुर्णेकरांची झाली आहे . पुर्णा जंक्शन येथील ब्रिटिश/निजाम काळापासून असलेली रनिंग स्टॉफ एक्सप्रेस/पेसेंटर स्टॉफची क्यू-बुकींग लॉबीच्या स्थलांतराचा कुटील डाव दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनातील भाषा/प्रांतवाद्यांसह असंतुष्ट राजकारण्यांकडून आखला जात असल्याची कुणकूण लागताच पुर्णा शहरासह तालुक्यातील सर्वसामान्य जनता व्यापारी प्रतिष्ठित नागरिकांनी स्वयंस्फुर्तीने उठाव करीत रेल्वे प्रशासना विरोधात आंदोलन केले परंतु या आंदोलनाला न जुमानता तत्कालीन विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनी पुर्णा जंक्शन येथील क्यू-बुकींग लॉबीचे लचके तोडल्यागत विभाजन करीत एक्सप्रेस क्यू-बुकींग लॉबी नांदेडला स्थलांतरीत केली असाच एक गंभीर प्रकार दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनातील भाषा/प्रांतवादी अधिकाऱ्यांसह असंतुष्ट राजकारण्यांनी केल्याचे निदर्शनास येत असून पुर्णेत जागेसह सर्व प्रकारच्या सुविधा असतांना देखील इलेक्ट्रिक लोको टिन शेड नांदेड येथे पळवण्याचा गंभीर प्रकार घडला आहे दक्षिण मध्य रेल्वे प्रशासन व असंतुष्ट राजकारण्यांनी घेतलेला हा निर्णय बदलण्याची क्षमता परभणी जिल्ह्यातील ना लोकप्रतिनिधींमध्ये आहे नाही व्यापारी संघटनांमध्ये नाही सामाजिक संघटनांमध्ये आता मात्र तेलही गेले अन् तुपही गेले अन् हाती मात्र धुपाटने आले अशी एकंदर अवस्था आम्हा पुर्णेकरांची झाली आहे .



# वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांचा वनसंवर्धनात सिंहाचा वाटा : मुनगंटीवार



आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** वनपरिक्षेत्र अधिकारी ( आर. एफ.ओ. ) हा वनखात्याचा अतिशय महत्वाचा भाग आहे. यांच्यामुळेच वनांचे रक्षण व संवर्धन होण्यास मदत होते, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्य व्यवसाय मंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले. फॉरेस्ट रेंजर्स असोसिएशन, महाराष्ट्रद्वारे आयोजित राज्यस्तरीय अधिवेशनात बोलताना ना. मुनगंटीवार यांनी वरील वक्तव्य केले. प्रत्येक आर.एफ.ओ.कडे वनविभागाची पूर्ण जबाबदारी असते व ती जबाबदारी पूर्ण गांभीर्याने प्रत्येक आर.एफ.ओ. पार पाडत असतो याचे मला समाधान आहे, असेही बोलताना पुढे ते म्हणाले की, कार्यक्रमाला फॉरेस्ट रेंजर असोसिएशनचे महाराष्ट्र अध्यक्ष कांतेश्वर बोलके, अरूण तिखे, असोसिएशनचे सरचिटणीस निलेश गावंडे, नागपूरचे मुख्य वनसंरक्षक रंगनाथ नायकडे, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विनोद देशमुख, संस्थेचे सरचिटणीस किशोर मिश्रीकोटकर मंचावर उपस्थित होते. याप्रसंगी आर्यनमन विजेता विशाल बोदडे यांचा ना. मुनगंटीवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रास्ताविक करताना असोसिएशनचे सरचिटणीस निलेश गावंडे यांनी आर.एफ.ओ. च्या विविध अधिकार व समस्यांवर सादरीकरण केले. यामध्ये मुख्यत कर्मचारीवर्गांची कमी असल्यामुळे काम करण्यास अडचणी येतात तसेच वेतनश्रेणीवर सुद्धा त्यांनी सादरीकरणात सांगीतले. याप्रसंगी बोलताना ना. मुनगंटीवार पुढे म्हणाले की, फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया यांच्या एका अहवालानुसार महाराष्ट्राचे हरीत क्षेत्र २५५० स्वेअर किमीने वाढले आहे. तसेच मॅनग्रोज चे क्षेत्र सुद्धा वाढले आहे. वनक्षेत्राशी संबंधित ज्या गोष्टी चांगल्या होत आहेत.

# मंदीत नोकरीच्या संधी

आधुनिक केसरी

जगभरातील अनेक फेसबुक, ट्विटर, ॲमेझोन, अशा दिग्गज आणि नावाजलेल्या कंपन्यांमधील कर्मचाऱ्यांना कामावरुन काढले जात आहे. या नोकरकपातीमुळे कर्मचारी वर्गात मोठे भीतीचे वातावरण निर्माण झाले असून आपली नोकरी जाणार की राहणार? अशा अवस्थेत अनेक कर्मचारी आहेत. याच नोकरकपातीच्या वातावरणात सध्या एक आनंदाची बातमी समोर आली असून या बातमीमुळे अनेकांना दिलासा मिळाला आहे. कारण एका भारतीय कंपनीने जवळपास २५ हजार लोकांना जॉब देणार असल्याचे सांगितले आहे. अकाउंटिंग क्षेत्रात काम करणाऱ्या बीडीओ इंडिया (BDO India) या भारतीय कंपनीने येत्या ५ वर्षांत २५ हजार लोकांना कंपनीत काम करण्याची संधी देणार असल्याचे म्हटले आहे. त्यानुसार दरवर्षी जवळपास ५ हजार लोकांना जॉब मिळू शकतात. BDO इंडिया या कंपनीमधील सध्याच्या कर्मचाऱ्यांची संख्या मागील आठवड्यात ५ हजारांच्या वर गेली आहे. कंपनीचे इंडिया मॅनेजिंग पार्टनर मिलिंद कोठारी यांनी सांगितले की, बीडीओने २०१३ मध्ये केवळ २३० कर्मचारी आणि २ ऑफिसद्वारे काम करण्यास सुरुवात केली होती. मात्र, आता कंपनीत ५ हजाराच्या वर कर्मचारी आहेत. कोठारी यांनी म्हणाले की, कंपनी २०२८ या वर्षाच्या अखेरीस, भारतातील ऑपरेशनमध्ये सुमारे १७ हजार तर ग्लोबल डेव्हलपमेंट सेंटर्समध्ये ८ हजार लोकांची भरती करेल. BDO कंपनीने १० वर्षांच्या कालावधीत व्यावसायिक सेवा क्षेत्रात स्वतःची एक अनोखी आणि मजबूत कंपनी अशी ओळख निर्माण केली आहे. या क्षेत्रावर अर्न्स्ट अँड यंग (EY), डेलॉइट, PwC आणि KPMG सारख्या मोठ्या कंपन्यांचे वर्चस्व आहे. BDO च्या सरासरी वार्षिक वाढीपैकी ४० टक्के ही ऑडिट विभागातून येते. कंपनीसाठी ऑडिट विभाग दरवर्षी ४० ते ४५ टक्के दराने वाढत आहे. मिलिंद कोठारी म्हणतात की, BDO ही आधीच देशातील सहावी सर्वात मोठी ऑडिट फर्म आहे. कंपनीने मध्य-मार्केट ग्राहकांना सेवा देण्यापासून सुरुवात केली. आता ही कंपनी बड्या उद्योग समूहांसह अनेक महापालिकांच्या लेखापरीक्षणाचे कामही करते. भारतातील ६ मोठ्या ऑडिट कंपन्या येत्या काही वर्षांत खूप वाढतील असेही ते म्हणाले.

# खलिस्तानीचे पुन्हा डोके वर



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

खलिस्तान चळवळ आता इतिहासजमा झाली आहे. असं जरी वाटतं असल तरी हा एक भास आहे. या चळवळीला शिखांचा पाठिंबा कमी झाला असला तरी खलिस्तानी अधून मधून डोके वर काढताना दिसतात.खलिस्तानवाद्यांना हल्क्यात घेणेखुप महागात पडू शकते. खलिस्तान समर्थकांनी देशाच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, पंजाबचे माजी मुख्यमंत्री बेअंत सिंग आणि माजी लष्करप्रमुख जनरल एएस वैद्य यांचीही हत्या केली होती.१९९५ नंतर खलिस्तानी घटना मोठ्या प्रमाणात कमी झाल्या होत्या, तर खलिस्तानच्या मागणीसाठी भारताबाहेर आंदोलने सुरूच होती. आता अलीकडच्या काळात पंजाबमध्ये पुन्हा एकदा डोके वर काढत आहे.

खलिस्तान म्हणजे खालशांचा वेगळा देश. स्वातंत्र्याच्या १८ वर्षांपूर्वी १९२९ मध्ये झालेल्या लाहोर अधिवेशनाशी या चळवळीची तार जोडलेली असली, तरी त्यात शिरोमणी अकाली दलाने शिखांसाठी वेगळ्या राज्याची मागणी केली होती, पण स्वातंत्र्यानंतर भारत आणि पाकिस्तान वेगळे झाल्यावर ही मागणी फेटाळण्यात आली. जास्त हवा मिळाली. 'पंजाबी सुबा चळवळ' १९४७ मध्येच सुरू झाली. १९६६ मध्ये इंदिरा गांधी सत्तेत असताना पंजाबचे तीन भाग झाले. शीख बहुसंख्य भाग पंजाब, हिंदी भाषिक बहुसंख्य भाग हरियाणा आणि तिसरा भाग चंदीगड बनला. असे असूनही खलिस्तानची मागणी सुरूच होती. वेगळ्या देशाची मागणी, वेगळे राज्य नाही. ८० च्या दशकात पंजाबमध्ये हिंसक घटना वाढत होत्या. 'ऑपरेशन ब्लू स्टार'मध्ये मारला गेलेला जर्नेलसिंग भिंद्रनवाले यामागे होता. यानंतर १९८४ मध्ये इंदिरा गांधींची हत्या, १९८५ मध्ये एअर इंडियाच्या फ्लाइटमध्ये झालेला स्फोट,१९९५ मध्ये तत्कालीन सीएम बेअंत सिंग यांची हत्या एका दशकात अनेक मोठ्या घटना घडल्या. मात्र, त्यानंतर खलिस्तानी घटना मोठ्या प्रमाणात कमी झाल्या होत्या, तर भारताबाहेर खलिस्तानच्या मागणीसाठी आंदोलने सुरूच होती. भारत दीर्घकाळ खलिस्तानी दहशतवादापासून मुक्त होता, परंतु अलिकडच्या वर्षांत ते पुन्हा एकदा डोके वर काढत आहे. अनेक प्रसंगी खलिस्तानचे समर्थक धर्मांध असल्याचे दिसून आले आहे. बब्बर खालसा, शीख फॉर जस्टिस, वारीस पंजाब दे यांसारख्या संघटना पुन्हा डोके वर काढताना कशाप्रकारे दिसतात ते घटनांद्वारे जाणून घेऊया.

परदेशात बसून भारतातील कटः- SFJ म्हणजेच शीख फॉर जस्टिसचा स्वयंघोषित मास्टरमाइंड गुरपतवंत सिंग पन्नू परदेशात बसून पंजाब आणि हरियाणामध्ये दहशतवादी कट रचत आहे. पटियाला येथील खलिस्तानविरोधी मोर्चावर खलिस्तान समर्थकांनी केलेल्या हल्ल्यातही पन्नू केंद्रस्थानी होते. एकदा त्याने खलिस्तानचे समर्थन आणि झेंडा उंचावण्याच्या बदल्यात भारतीय तरुणांना आयफोन देण्याचे आश्वासन दिले होते. तीन कृषी कायद्यांविरोधात शेतकरी आंदोलनाला पाठिंबा दिल्याचे आरोप झाले.

शेतकरी चळवळीला तार जोडल्या गेल्याः- कृषी कायद्याच्या विरोधात दीर्घकाळ चाललेल्या शेतकरी आंदोलनाच्या ताराही खलिस्तानच्या समर्थकांशी जोडल्या गेल्या होत्या. सिंघू सीमेवर, आंदोलक खलिस्तानी कट्टरपंथी जनरेलसिंग भिंद्रनवाले यांचे फोटो फिरवताना दिसले आणि खलिस्तानच्या समर्थनार्थ घोषणा देण्यात आल्या. ऑपरेशन ब्लू स्टारमध्ये मारल्या गेलेल्या जर्नेलसिंग भिंद्रनवाला आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे गौरव करणारे शहीद-ए-खलिस्तान हे पुस्तकही पुस्तकांच्या स्टॉलवरून वितरित करण्यात आले. नंतर लाल किल्ल्यावर खलिस्तानी ध्वज फडकवल्याचा आरोपही झाला, जरी तो ध्वज शिखांचा धार्मिक ध्वज होता.

हिमाचल विधानसभेबाहेर खलिस्तानी झेंडेः - गेल्या वर्षी मे महिन्यात हिमाचल विधानसभेबाहेर खलिस्तानी झेंडे बांधलेले दिसले होते. तपोवन, धर्मशाला येथील विधानसभेच्या इमारतीच्या सीमा भिंतीवर खलिस्तान समर्थक घोषणाही लिहिण्यात आल्या होत्या. या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपींनी घटनास्थळावरून व्हिडिओ बनवून एसएफजे प्रमुख पन्नूसोबत शेअर केल्याचे सांगितले होते. एसआयटीने २४७ लोकांचे मॉड्यूल शोधून काढले होते, त्यापैकी १५ परदेशी होते, तर १८८ देशांतर्गत होते. पन्नूच्या सांगण्यावरून पटियालामध्ये गोंधळ :- गेल्या वर्षी ३० एप्रिल रोजी पंजाबच्या पटियालामध्ये प्रचंड हिंसाचार झाला होता. खलिस्तानी दहशतवादी पन्नूने खलिस्तान स्थापना दिवस साजरा करण्याची घोषणा केली होती, त्यानंतर स्थानिक हिंदू संघटनेने खलिस्तानी मुर्दाबाद मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. मोर्चा काढल्यानंतर खलिस्तान समर्थकांनी निषेध केला आणि दोन समुदायांमधील तणाव इतका वाढला की त्याचे रूपांतर दगडफेक आणि गोंधळात झाले. **अजनाळ्यात गोंधळः**- २३ फेब्रुवारी रोजी खलिस्तान समर्थक संघटना वारिस पंजाब देने अजनाळा, पंजाबमध्ये मोठा गोंधळ घातला.



लवप्रीत सिंग तुफानच्या अटकेविरोधात संघटनेचे प्रमुख अमृतपाल सिंग यांनी शेकडो समर्थकांसह पोलीस ठाण्यावर तलवारी, लाठ्या-काठ्या घेऊन हल्ला केला. पाच तास बावळी पोलीस ठाण्याचा ताबा घेतला. या गोंधळात सहा पोलिसही जखमी झाले. मात्र, आता लवप्रीतची सुटका होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

कॅनडा पासून यूके आणि ऑस्ट्रेलिया पर्यंत उपस्थिती खलिस्तान समर्थक संघटना आणि दहशतवाद्यांची उपस्थिती कॅनडापासून दुबई, पाकिस्तान, ब्रिटन आणि ऑस्ट्रेलियापर्यंत आहे. परदेशात अनेक हिंदू मंदिरांची तोडफोड केल्याच्या घटना घडल्या आहेत, ज्यांच्या तारा खलिस्तान समर्थकांशी जोडल्या गेल्या आहेत. १२ जानेवारीला स्वामीनारायण मंदिरावर हल्ला, १६ जानेवारीला व्हिक्टोरियातील श्री शिव विष्णू मंदिराची तोडफोड, २३ जानेवारीला मेलबर्नमधील इस्कॉन मंदिराची तोडफोड. महाशिवरात्रीच्या दिवशी क्वीन्सलँडमधील गायत्री मंदिराला फोन करून खलिस्तान झिंदाबादच्या घोषणा देण्यास सांगण्यात आले. अशा घटना सातत्याने समोर येत आहेत.

वारंवार होणाऱ्या अटकेमुळे संताप पंजाब, हरियाणा, दिल्ली, हिमाचल प्रदेश, मध्य प्रदेश या राज्यांमध्ये खलिस्तान समर्थक दहशतवाद्यांना सातत्याने अटक करण्यात आली आहे. मे २०२२ मध्ये, दिल्लीत दहशत माजवण्याचा कट रचणाऱ्या बब्बर खालसाशी संबंधित चार दहशतवाद्यांना कर्नालमध्ये मोठ्या प्रमाणात शस्त्रांसह अटक करण्यात आली होती. दहशतवाद्यांचे संबंध पाकिस्तानात उपस्थित असलेल्या खलिस्तान समर्थक दहशतवादी हरविंदर सिंग उर्फ रिंडा यांच्याशी असल्याचे सांगण्यात आले. २४ डिसेंबर रोजी खलिस्तानी समर्थक प्रभज्योत सिंगला मध्य प्रदेशातील जबलपूरमधून अटक करण्यात आली होती. यानंतर पन्नू यांनी मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यावर जोडा फेकणाऱ्याला २५ हजार डॉलर्सचे बक्षीस जाहीर केले. या वर्षी २६ जानेवारीपूर्वी दिल्ली पोलिसांनी चार खलिस्तान समर्थक दहशतवाद्यांना अटक केली होती. सततच्या अटकेमुळे खलिस्तानी संघटना संतप्त झाल्या आहेत. ताज्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर पंजाब पोलीस अनेक जिल्ह्यांमध्ये सतर्क आहेत.

# मराठी भाषा ज्ञानभाषा कशी होईल ?



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी

मनुष्य जन्माविषयी विचार केला तर अनेक गुढ तत्वांचा शोध लागला आहे त्याला विचाराचं देवाणघेवाणीच कोंदण लाभलं आहे. मराठी ही आपली मायभाषा आहे संवादाचे माध्यम म्हणून भाषे कडे पाहिले पाहिजे. मनुष्य आपल्या ऊत्कर्षासाठी सतत धडपडत असतो तो आपल्या आजूबाजूला घडत असलेल्या घटना बारकाईने शोधतो, विकास करतो व वाढवतो. यामध्ये अनेक विचारांची व विषयांशी आपला परिचय होतो.ते सर्व भाषा या माध्यमातून होत असते. आमची मराठी भाषा आहे. तर देवनागरी ही मराठीची वर्णलिपी आहे. मित्रांनो'नदीचं मुळ ऋषीचं कुळ विचारू नये म्हणतात !

भाषेचा अभ्यास करण्यासाठी त्याची पूर्णपणे माहिती मिळवावी लागते ।म्हणून काही नियम बाजूला ठेवून अभ्यास करावा लागतो. आमची 'मायमराठी'भाषा सुध्दा नदीच्या काठावर निर्माण झाली. अनेक ऋषी मुनींनी ,विचारवंतांनी तिला सजवलं अभ्यास पूर्ण लेखन करून एक अनमोल ठेवा पूढच्या पिढीला दिला. आणि तीचं महत्व ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या "पसायदाना मुळे विश्वात्मक झालं". त्यानंतरच्या पिढीने जतन करून मराठी भाषा गौरवशाली केली. अनेक मान्यवर विद्वानांनी आपले आयुष्य मराठी संवर्धना साठी पणाला लावले. मराठी भाषेचा अभ्यास केला त्यांच्या योगदाना मुळे मराठी भाषा'राजभाषा'म्हणून गौरवाने ऊभी आहे. याचा मला गर्व व अभिमान आहे. ज्ञानविजय,भक्तिविजय,या अतिप्राचीन ग्रंथ संपदे बरोबर ती ज्ञानेश्वर महाराजांच्या रूपात 'विश्वात्मक'आहे. अवघ्या जगाला आपलंस करण्याचं सामर्थ्य तिच्यात आहे. तर तुकाराम महाराजांच्या अभंगातून कधीही भंग न होण्याचं सामर्थ्य माझ्या मराठीत आहे. प्रत्यक्ष विश्वाचं आर्त मनामध्ये ठसवणारी माझी मराठी आहे. मराठी भाषेचं अस्तित्व २/३ हजार वर्षाच आहे. मी वरती म्हणाले की अनेक विद्वानांनी तिच्या अभ्यासासाठी आयुष्य वेचले अनेक ग्रंथ मग ते आयुर्वेदाचे ज्ञान सांगणारे असोत की वैज्ञानिक दृष्टीकोन असलेले ग्रंथ भांडार असो ही सर्व वैचारिक संपत्ती आहे. व धार्मिक ग्रंथ आहेत. तर ही मराठी पायाभूत कशी आहे याचा विचार केला तर मराठी वर्णमालेमध्ये अ आ पासुन सुरवात होते व अं आः पर्यन्तचे बारा स्वर आहेत म्हणजे त्याला 'बाराखडी' म्हणतात. 'अ' ते ' ज्ञ 'पर्यत शब्दलिपी म्हणजे मराठी होय. आपण शाळेत पहिले पाऊल ठेवले की आपल्याला सर्व प्रथम बाराखडीची ओळख होते. मित्रांनो आपल्या भाषेची गंमत बघा हं स्वर,व्यंजन,अनुनासिक शब्द,जोडाक्षरे ,-हस्व दिर्घ, पहिली वेलांटी दुसरी वेलांटी, पहिला ऊकार दुसरा ऊकार दोन पाकळ्यांचा शब्द ,शेंडीफोड्या शब्द, पोटफोड्या शब्द अशा अनेक गमतीदार शब्दांच्या कोंदणात ठेऊन तिला अलंकृत करता येते. पूर्ण विराम,अर्धविराम, स्वल्पविराम अवतरण चिन्ह,प्रश्नचिन्ह,ऊद्गार वाचक चिन्ह या सर्व आशयघन शब्दानी भाषेचा गोडवा वाढतो. मराठी भाषेला वळवावी तशी वळते. दर बारा कोसावर ती बदलते.. अशी ही साधीसोपी मराठी भाषा आहे. भजन पोवाडे किर्तन, कवन,याबरोबरच 'ज्ञान विज्ञान दायकम्'अशी मराठी भाषा आहे. मराठी भाषा'ज्ञानभाषा' व्हायला हवी असेल तर सरकार दरबारी तिला योग्य न्याय मिळाला पाहिजे. महाराष्ट्रात जेवढ्या शैक्षणिक संस्था आहेत त्यासर्व शाळे मराठी सक्तिची केली पाहिजे. सर्वत्र मराठीचा वापर केला पाहिजे शाळा कॉलेज मध्ये मराठी चे वेगवेगळे ऊपक्रम राबवले पाहिजेत मुलांना प्रोत्साहित केले पाहिजे. त्यांच्याकडून मराठी विषयावर वेगवेगळ्या परिक्षा घेऊन, मराठी साठी वाङःमय मंडळे स्थापन केली पाहिजेत. कुसुमाग्रज, केशवसुत, वि.दा. करंदीकर, पु.ल. देशपांडे, प्र.के. अत्रे, स्वातंत्रवीर सावरकर, बहिणाबाई चौधरी अशा अनेक दिग्गज लेखकांनी मराठी जोपासली त्यांच्या नावाने प्रत्येक तालुका स्तरांवर खेड्यापाड्यात, शहरातील सोसायटी मध्ये जुन्या जाणत्या लोकांना बरोबर घेऊन साहित्य संपदा वाढवली पाहिजे त्यांच्याच मार्गदर्शनाखाली विज्ञान शिबिरे घेऊन विज्ञान मराठी मध्ये शिकवलं पाहिजे. यासाठी मी थोर शास्त्रज्ञ जयंत नारळीकरांचे विषेश आभार मानते त्यांनी यावर विपूल लिखाण केले आहे. हे लिखित व खेळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिकवलं पाहिजे. ' विद्यार्थी' केंद्र बिंदू मानला व त्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले तर आजचे विद्यार्थी ऊद्याचे सुजाण नागरिक होणार आहेत ते ज्या क्षेत्रात त्यांना गोडी वाटेल ते सर्व परकीय भाषेतील अर्थशास्त्र, विज्ञानशास्त्र, शरिरशास्त्र, अंक शास्त्र, खेळ, सौदर्य शास्त्र ,राज्यशास्त्र असे अनेकविध शास्त्रांचा आपल्या मराठी लेहेजानुसार शब्दांची मांडणी करतील अनेक देश विदेशात तीची गोडी लागेल. कारण ती रसाळ,मधूर,अविट गोडीची आहे आणि ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदानातील 'आता विश्वात्मके'ही ओळ सार्थ होईल. हे अशक्य नाही त्यासाठी सर्वत्र प्रचार प्रसार झाला पाहिजे. घर,घराभोवतीचा परिसर,शाळा कॉलेज बरोबर सरकारने मराठी ची चाललेली अवहेलना थांबवून तिला प्रोत्साहन दिले पाहिजे हे कुणा एकट्या दुकट्याचे काम नाही यासाठी जात,धर्म,पंथ सगळं विसरून सर्वांनी एकत्र येऊन मराठी साठी आस्था दाखवली पाहिजे. मी आशा करते तो दिवस दूर नाही. मराठी'ज्ञानभाषा होईल अशी श्री गणेशाला व शारदा मातेला वंदन करून मागणं मागते. परमात्मा आपली ईच्छा पूर्ण करेल अशी आशा करते.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९


Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# कांदा उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था अतिशय बिकट

## छगन भुजबळ : निर्यातीला चालना देण्यासह नाफेडमार्फत खरेदीच्या उपाययोजना तातडीने करा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यातील कांद्याचे दर कोसळले असून कांदा उत्पादक शेतकऱ्यांची अवस्था अतिशय बिकट झाली आहे. त्यामुळे शासनाने कांदा निर्यातीला अधिक प्रोत्साहन देण्यासोबत नाफेड मार्फत कांदा खरेदी सुरु करून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा द्यावा तसेच बांग्लादेशात द्राक्ष निर्यात करण्यासाठी असलेली इम्पोर्ट ड्युटी कमी करण्यासाठी पंतप्रधानांनी स्वतः बांग्लादेशाच्या पंतप्रधानांशी बोलून प्रश्न मार्गी लावावा. यासाठी राज्यशासनाने केंद्रसरकारकडे पाठपुरावा करून प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांनी आज सभागृहात केली.



कांद्याचे दर कोसळल्याने नाशिक जिल्ह्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांकडून आंदोलन करण्यात येत आहे. याकडे छगन भुजबळ यांनी सभागृहाचे लक्ष वेधले आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी केली. सुमारे ५ क्विन्टल कांदा विक्रीनंतर शेतकऱ्याला केवळ १८ रुपये शिल्लक राहताय ही अतिशय गंभीर बाब आहे. कांदा उत्पादक शेतकरी हा अतिशय गरीब शेतकरी आहे. त्यामुळे त्यांना दिलासा देण्यासाठी गेल्यावेळी उपमुख्यमंत्री असताना ३०० कोटी रुपयांची मदत तातडीने देण्यात आलेली होती. त्यामुळे आता देखील दिलासा देण्यासाठी तातडीने मदत देण्यात यावी अशी मागणीही छगन भुजबळ यांनी केली. इतर देशात कांद्याची प्रचंड मागणी आहे. मात्र आपल्याकडे निर्यातीच्या धरसोड धोरणामुळे कांदा व्यापारी इतर देशांकडे वळला आहे त्याचाही फटका आपल्याला बसत आहे. त्यामुळे कांदा अधिक निर्यात होण्यासाठी निर्यातीला अधिक चालना देण्यात यावी.केंद्रसरकारने बंद केलेली कांदा निर्यात प्रोत्साहन योजना पूर्ववत सुरु करावी. एकीकडे कांदा दर वाढले की तातडीने भाव कमी करण्यासाठी कांदा निर्यातीवर निर्बंध आणले जातात. आता कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत आला आहे. त्यामुळे जास्तीत जास्त कांदा निर्यात केला जावा. तसेच किंमत स्थिरीकरण निधीअंतर्गत नाफेडमार्फत कांदा खरेदी करण्यात यावा यामुळे काही प्रमाणात कांद्याचे भाव वाढून शेतकऱ्यांना दिलासा मिळेल असेही छगन भुजबळ म्हणाले. दरम्यान यावेळी उत्तरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कांदा उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तातडीने नाफेडमार्फत कांदा खरेदी करण्यात येत आहे. तसेच कांदा निर्यात देखील सुरु असल्याची माहिती दिली.



# सांस्कृतिक कार्यक्रमातून कलाविष्कार

## मोरेश्वर इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** शालेय जीवनातील वार्षिक स्नेहसंमेलन हे विद्यार्थ्यांसाठी एक पर्वणीच ठरते.सुप्त कलागुणांना वाव देऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी मोरेश्वर इंग्लिश स्कूलने सांज चिमण पाखरांची वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन केले होते. या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांनी मोठ्या आत्मविश्वासाने आपला कलाविष्कार सादर केला. वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या सुविद्य पत्नी सौ.निर्मलाताई दानवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच प्रतिभा भुजंग,योगीता दानवे,शोभा मतकर, आशा पुंगळे, खुशी दानवे, मंगल मगरे, सुधाकर दानवे, गणेश साबळे, गजानन नागवे, माणिक दानवे,भाऊसाहेब भुजंग,ज्ञानेश्वर पुंगळे, भगवान नागवे, पंडित पुंगळे ,मुसा सौदागर , रमेश पुंगळे, रामेश्वर सोनवणे, अप्पासाहेब पुंगळे, पंढरीनाथ करपे,रतन ठोंबरे,संतोष मगरे,आकाश पुंगळे, सुनील दानवे ,संतोष सोनुने, राधाकिसन किरड, समाधान माळी, सलीम शेख , दीपक घुगे, डॉ. काबरा, डॉ.भंडारी, डॉ. मुलतानी आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमातून विदयार्थ्यांनी भारतीय संस्कृती, वेशभूषा, लोकगीते,देशभक्ती पर गीते, लावणी, विनोद, नाटक, चित्रपट व देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर करूनउपस्थितांची मने जिंकली.चिमुकल्यांचा अभिनय आणि समाधीटपणा पाहून पालकांनी देखील उत्स्फूर्तपणे टाळ्या वाजून विद्यार्थ्यांच्या कलेला दाद दिली. विद्यार्थ्यांनी वर्षभरामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मान्यवरांच्या हस्ते समूर्तीचिन्ह, बक्षीसे व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास ग्रामस्थ, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शक सुनील दानवे, प्राचार्य राधाकिसन किरड, सचिन ठाकूर, भाग्यश्री मालुसरे, अनुराधा मगर यासह शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाग्यश्री मालुसरे व अनुराधा मगर यांनी केले तर आभार सचिन ठाकूर यांनी मानले.



# शेतकऱ्यांवर लाठीमार करणाऱ्या पोलिसांवर कारवाई करा

## विरोधी पक्षनेते अजित पवार यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सोयाबीन व कापसाला दरवाढ मिळावी, यासह शेतकऱ्यांच्या अनेक मागण्यांसाठी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी आत्मदहनाचा इशारा दिलेला होता. शांततेने, अहिंसक मार्गाने सुरु असलेल्या आंदोलकांवर पोलिसांनी बेछूट लाठीचार्ज केला. आंदोलक शेतकऱ्यांवर लाठीचार्ज करणाऱ्या पोलिसांवर आणि आदेश देणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर चौकशी करून तातडीने कारवाई करण्याची मागणी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे केली. अतिवृष्टीची नुकसान भरपाई, पीकविमा रक्कम इत्यादी शेतकऱ्यांना मिळण्यासाठी शेतकरी संघटनेमार्फत शांततेत आंदोलने केले आहे. राज्यातील शेतकऱ्यांपैकी जवळपास ५० टक्के शेतकरी हा सोयाबीन उत्पादक आहे. देशाच्या सोयाबीनच्या उत्पादनापैकी जवळपास ४० टक्के उत्पादन महाराष्ट्रात होते. साधारणतः सोयाबीन उत्पादनाचा प्रतीक्विंटल उत्पादन खर्च ५ हजार ७८३ रुपये आहे. सद्याचा बाजारभाव रु.५ हजार ते ५ हजार ५०० या दरम्यानच आहे. त्यामुळे सोयाबीन पिकाला दरवाढ मिळावी यासाठी त्यांचे आंदोलन होते. कापूस पिकालाही यावर्षी ८ हजार १८४ रुपये उत्पादन खर्च आलेला आहे. तर सध्याच्या कापसाचा बाजारभाव ७ हजार ५०० ते ८ हजार ५०० दरम्यानच आहे. सातत्याने सोयाबीन व कापसाच्या भावात चढउतार होत आहे. उत्पादन खर्चही निघत नाही. त्यामुळेच शेतकऱ्यांसाठीचे हे आंदोलन होते. या



आंदोलनानंतर शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांना स्थानबध्द करून त्यांना तातडीने दवाखान्यात नेले नाही. त्याऐवजी त्यांच्यासोबत आलेल्या शेतकऱ्यांवर बेछूटपणे लाठी हल्ला केला त्यामध्ये ज्येष्ठ नागरीक, महिला, लहान मुले यांचा समावेश होता. तसेच तिथे वार्तांकन करणाऱ्या पत्रकार बांधवांनासुद्धा धक्काबुक्की करत मारहाण करण्यात आली एकंदरीत लाठी हल्ला हा पुर्व नियोजित कट होता असा आरोपही अजित पवार यांनी केला.

रविकांत तुपकर यांना वैद्यकीय तपासणीसाठी दवाखान्यात दाखल केल्यानंतर अनेक विद्यमान व माजी विधानसभा सदस्यांना तुपकर यांना भेटू दिले नाही. सनदशीर मार्गाने होणारी आंदोलने दडपण्याचा प्रयत्न शासनाकडून सुरु आहे. यामध्ये पोलीस अधिकाऱ्यांना हाताशी धरून अशी कृत्ये केली जात असून पोलीस अधिकाऱ्यांचे मदतीने त्यांचेवर गंभीर गुन्ह्यातील कलमे लावण्यात आली आहेत. यामध्ये पोलीस अधिकारी जाणूनबुजून त्यांना त्रास देत आहेत असेही अजित पवार म्हणाले.

महाराष्ट्र Business Katta












# समाधानभाऊ सावळे पाटील: मित्रत्व जपणारा भला माणूस


आधुनिक केसरी

**जो दिलं को अच्छा लगता है,उसी को दोस्त कहता हूँ मुनाफा देखकर मैं...रिश्तों की सियासत नही करता   ह्या गुलजार च्या शायरी मधील ओळी भाऊ पाटील यांच्यावर तंतोतंत लागू होतात. समाधानभाऊ सावळे पाटील,संपूर्ण आयुष्य माणूस म्हणून जगलेला, माणूस म्हणूनच प्रत्येकाशी वागलेला, आणि भला माणूस ह्या ओळखीसह,सर्वांसाठी जिवाभावाचा मित्र म्हणून प्रत्येकाला आपली उणीव भासावी अशा समाधानभाऊ सावळे पाटील उपाख्य भाऊ पाटील यांची आज जयंती.  १ मार्च १९६७ रोजी जन्मलेल्या भाऊ पाटलांनी ३ डिसेंबर २०२२ रोजी ह्या जगातून एक्झिट घेतली. भाऊंचं जगणं हे ' मेरे दोस्त,जिंदगी लंबी नही,बडी होनी चाहीये, अस जे आनंद चित्रपटातील राजेश खन्ना यांच्या संवादाच्या पठडीतले होते.ह्या माणसाचा गोतावळा केवळ राज्यात नव्हे तर राज्याबाहेर जाऊन पोहचलेला होता.त्यांच्या मैत्रीचं चक्रव्यूह एव्हडे जबरदस्त होते की, त्यांच्या गोतावळ्यात जो गेला तो कधी बाहेर पडू शकला नाही. आयुष्याची आनंदयात्रा या माणसाने जगली. आपल्या माणसाचं मोठेपण कसं जपावं,त्याला मोठेपण कसं मिळवून द्यावं आणि त्याचं वेगवेगळ्या पद्धतीने कौतुक कसं करावं हे केवळ आणि केवळ भाऊ पाटीलच करू जाणे.मित्र हीच संपत्ती मानणारा,मित्रांच्या वाढदिवसावर,त्यांच्या एखाद्या निवडीवर लाखोंचा खर्च करण्याची दानत भाऊ पाटलांशिवाय दुसऱ्या कुणात अजून तरी बघायला मिळाली नाही.**



जिंदगी हमे खूबसुरत दोस्त देती है,लेकिन अच्छे दोस्त हमे खूबसुरत जिंदगी देते है ह्या प्रमाणे सर्वांसाठी चांगलं आयुष्य देणारा जिवाभावाचा मित्र, मित्रांचा प्रचंड गोतावळा सोडून गेला.त्यांच्या संपर्कातील हजारो मित्रांचे डोळे आज देखील दररोज अभिषेक पात्र होतात,हीच ह्या माणसाच्या आयुष्याची पावती आहे. अतिशय सर्वसामान्य परिस्थितीत जन्मलेल्या, हलाखीचे आयुष्य जगलेल्या माणसाने पत्रकारितेत कमालीचा संघर्ष केला.ऑफिस बॉय पासून वेगवेगळ्या वर्तमानपत्रात पत्रकारिता केली.बुलडाणा शहरात ताक,दूध दही विकले. मराठी पत्रकार परिषदेचे बुलडाणा जिल्हाध्यक्ष म्हणून काम केले.

अधिकारी- राजकारणी यांच्याशी वैयक्तिक नाळ जुळवून आपला मोठा गोतावळा उभा केला. हिरो होंडा मोटारसायकल घेऊन तिच्यावर माणूस असावं लिहून वणवण भटकणाऱ्या या माणसाने वैभव पायाशी लोळण घेत असतांना आपल्या पूर्वीच्या दिवसाची आठवण कायम ठेवत माणूस लिहलेली आपली दुचाकी तशीच कायम ठेवली. माजीमंत्री डॉ राजेंद्र शिंगणे यांच्या सहकार्याने चिखली तालुक्यातील चांधई  येथे मुलींची सैनिकी शाळा उभी केली. त्याच शाळेची विद्यार्थिनी असलेली मनीषा पवार नावाची तरुणी बुलढाणा जिल्हा परिषदेची अध्यक्षा झाली. कुणी पायलट,कुणी डॉक्टर अशा पद्धतीने मुलींना घडविण्याचें काम केले. मित्र कमावले, पैसा कमावला आणि शेवटपर्यंत सामाजिक बांधिलकी जोपासली. ह्या संघर्षमय प्रवासात नात्याने सख्ख्या मामाची मुलगी असणारी त्यांची पत्नी उषा वहिनी यांनी कमालीची साथ दिली.स्वतःच्या आईवर जीवापाड प्रेम केलं. राहुल,विक्की ही दोन आज्ञाधारक मुले, सतत काळजात जपलेली लाडकी लेक किरण,मुलांप्रमाणे ज्याला मानलं तो जवाई सागर, कमालीची लाडकी असलेली नात डुग्गू, जीचा पहिला वाढदिवस साजरा केला ती नात,राहुल चि मुलगी रेवा ( लक्ष्मी ) ,सून प्राजक्ता, भाचे शंकर, शरद ह्यांच्यासह वेगवेगळ्या क्षेत्रातील हजारो मित्रांचा गोतावळा,आवाज दिला की धावून येणाऱ्या दद्दु ( दयाभाऊ कदम ) पासून माझ्यापर्यंत चा गोतावळा शेवटपर्यंत जपला.कुणाकुणाची नावे घ्यावीत,कुठून सुरुवात करावी,अन कुठे थांबावं हे कुणीही सांगू शकणार नाही.कुणी मंत्रालयातील,कुणी पत्रकारितेतील, कुणी अधिकारी,कुणी कर्मचारी,ह्यासह सर्वसामान्य माणसाशी भाऊ पाटील यांचं आंतरिक नातं होतं. त्यांच्या गोतावळ्याला कुठली सीमा नव्हती. ना पक्ष ना धर्म कधी त्याच्या आड आला.




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

करोडो रुपयांची संपत्ती जवळ असणाऱ्या ह्या माणसाची खरी संपत्ती होती मित्रांचा गोतावळा. कुठलाही प्रसंग असो,सुखाचा की दुःखाचा,एव्हढेच काय तर आमच्यातीलच कुणाची टिंगल उडवायची असली तरीही भाऊ पाटील,मी, प्रख्यात साहित्यिक अजीम नवाज राही,राजेंद्र काळे अशा आमच्या मित्र मंडळींचा कॉन्फरन्स कॉल असायचा व आम्ही तासन् तास फक्त हसत रहायचो.आजही त्यांचे स्मरण झाले की सर्वांचे डोळे पाणावतात.आधार तरी कुणी कुणाला द्यावा.. ? सांत्वन तरी कुणी कुणाचे करावे. ? अशी परिस्थिती आजही आहे आणि उद्या देखील असणार आहे. हा माणूस प्रत्येकाला आपला वाटायचा,नव्हे तो होताच प्रत्येकाचा.आयुष्यात गोडवा वाटत राहणे हा स्वभाव असल्याने  भाऊ पाटील यांचं कुठेही जाणं उत्सवी असायचं. प्रत्येक दुःखाचा एक काळ असतो. तो जस जसा पुढे सरकत जातो,तस तशी दुःखाची तीव्रता कमी होत असते.

भाऊ पाटील त्या काळा च्या पलिकडले व्यक्तिमत्व होते.कुठलाही काळ दुःखाची तीव्रता कमी करणार नाही.उलटपक्षी त्यांच्या संपर्कात आलेल्यांना पदोपदी त्यांची उणीव भासणार आहे.

काही चांगली माणसं समाजाच्या कामी आली पाहिजे,ती टिकली पाहिजे,जगली पाहिजे.त्यांचं जगणं हे समाजासाठी गरजेचं असतं असं एका मैफिलीत म्हणणाऱ्या भाऊ पाटलांनी मात्र घेतलेली एक्झिट धक्का देणारी आहे.  कोरोना च्या काळात जिल्हा प्रशासनाला भाऊ पाटील ग्रुपच्या माध्यमातून ऑक्सिजन पुरविणारा भाऊ पाटील हाच माणूस मैत्रीचे ऑक्सिजन होता.आज भाऊ पाटील यांचा वाढदिवस,आज त्या वाढदिवसाला दुर्दैवाने जयंती म्हणावे लागते आहे.त्यांच्या जयंती निमित्त मित्रवर्य बबनराव जाधव आणि प्रा सुनील सपकाळ यांचेसह भाऊ पाटील ग्रुप ने मॅरेथॉन स्पर्धा ठेवली आहे. हजारो मित्रांचा गोतावळा सोडून,माणूस म्हणून जगलेला हा माणूस न संपणाऱ्या मॅरेथॉन मध्ये  सर्वांना सोडून गेला.

ऐ खुदा मेरे दोस्त को सलामत रखना,वरना मेरे जीनेकीं  दुवा कौन करेंगा

अशी भावना कदाचित त्यांनी ठेवली असेल,पण त्यांच्या आयुष्यासाठी  ना आमची दुवा कामी पडली,ना दवा.

मैत्रीचं गणितच फार वेगळं असतं. यात दोघांमधून एक गेला की शून्य उरतं.

**ऐ दोस्त क्या लिखुं तेरी तारीफ मे**
**तू बडा खास था,मेरी जिंदगी मे**

# मराठी भाषा आणि आम्ही

आधुनिक केसरी

**संपूर्ण भारतात जसा महाराष्ट्र आणि महाराष्ट्राची संस्कृती प्रेरणादायी आहे, तशी मराठी भाषा देखील प्रेरणादायी आहे. त्यामुळेच दरवर्षी २७ फेब्रुवारी हा कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिन आपण महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा गौरव दिवस म्हणून उत्साहात साजरा करीत असतो.**

**संत ज्ञानेश्वर म्हणतात...**
**माझा मराठीची बोलू कौतुके।**
**परि अमृतातेहि पैजासी जिंके।**
**ऐसी अक्षरे रसिके।मेळवीन ।।**

असे म्हणत त्यांनी मराठी भाषेविषयीचा अभिमान, मराठीची महती व्यक्त केली आहे. 'अमृतालाही पैजेनी जिंकणारी अक्षरे', अशी अमृतवाणी ज्ञानदेवांच्या प्रत्येक शब्दाशब्दातून व्यक्त झाली आणि ब्रह्मविद्याच जणू शब्दरूप झाली. "अमृताहूनही गोड" असे ज्ञानेश्वर महाराज जिच्याविषयी म्हणतात, ती मराठी भाषा ही माझी मातृभाषा आहे याचा मला अभिमान आहे. मला माझी मराठी भाषा फार आवडते. आपली मराठी भाषा महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या प्रकारे बोलली जाते. तरीही त्या त्या भागातील मराठी भाषेची गोडी अवर्णनीय आहे.

मराठी भाषेतील साहित्याचा दर्जा उच्च आहे. आपल्या संतांनी लिहिलेले ग्रंथ आणि विचारवंतांचे साहित्य यामुळे मराठी भाषा समृद्ध झाली आहे. संत ज्ञानेश्वर यांनी भगवद्‌गीतेवर मराठी भाषेत ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला. संत नामदेव यांनी अभंग लिहिले. संत एकनाथांनी एकनाथी भागवत लिहिले. तसेच भारुडेही लिहिली. संत तुकाराम महाराजांनी मराठी भाषेला एक समृद्ध साहित्यिक भाषा बनविली. मुकुंदराज हे मराठी भाषेतील आद्य कवी होते. ज्ञानेश्वरांच्या जन्माआधी मुकुंदराजांनी समाधी घेऊन पंचाहत्तर वर्षे झाली होती. मुकुंदराजांनी विवेकसिंधू या ग्रंथाद्वारे शंकराचार्यांच्या वेदांतावर निरुपणात्मक विवेचन केले आहे. मराठीतील हा आद्यग्रंथ त्यांनी बीड जिल्ह्यातील आंबाजोगाई या आपल्या जन्मगावी लिहिला.

आज मराठी भाषा ज्या रुपात जिवंत आहे ती केवळ छत्रपती शिवाजी महाराजांमुळे असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही,. कारण त्यांच्या काळात मराठी भाषेला खरे महत्त्व प्राप्त झाले. या भाषेचा विस्तार, बोली भाषा तसेच शासकीय कामकाजाकरिता झाला.

आजकाल जरी मुलांना इंग्रजी शाळेत शिकविण्याचा पालकांचा कल वाढत असला तरी मातृभाषेतून घेतलेले शिक्षण हे जीवनभर फायदेशीर ठरते असे वैज्ञानिक दृष्ट्या सिद्ध झालेले आहे. या निमित्ताने मलासुद्धा मराठी भाषेतील शिक्षणाबद्दल माझी वैयक्तिक माहिती सांगण्याचा इथे मोह होत आहे. माझे संपूर्ण शालेय शिक्षण हे बदनापूर {तालुका जालना} या माझ्या छोट्याशा गावात जि.प. शाळेत १९५६ ते १९६६ या काळात मराठीतून झालेले आहे. ही तर फार जुनी गोष्ट झाली. परंतु  पुढे स्टेट बँक ऑफ हैदराबादमधील माझ्या नोकरीमुळे मला वारंवार बदलीला सामोरे जावे लागत असे. माझी बदली वेगवेगळ्या तालुक्याच्या ठिकाणी होत असे. माझ्या नोकरीच्या काळात माझी तिन्ही अपत्ये {दोन मुले, एक मुलगी} अगदी छोटी होती. त्या सर्वांचे शिक्षणसुद्धा त्या त्या गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये मराठी माध्यमातच झालेले आहे. मराठी माध्यमाद्वारे शिक्षण घेऊनसुद्धा माझी तिन्ही अपत्ये आज आपापल्या नोकरीमध्ये उच्च पदावर आहेत.




दोन्ही मुले बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये इंजिनीअर आहेत तर माझी मुलगी औरंगाबाद येथे उपजिल्हाधिकारी आहे. विशेष म्हणजे माझा लेखनाचा वारसा या तिघांनी घेतला असून त्यांनी  मराठी साहित्याच्या प्रांतात आपापले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. असो.

शेवटी, कविवर्य सुरेश भट यांच्या शब्दांमध्ये सांगायचे म्हणजे,

**लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी एवढ्या जगात माय मानतो मराठी**

**उद्धव भयवाळ**
**१९, शांतीनाथ हाऊसिंग सोसायटी**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो: ८८८८९२५४८८**

# माझ्या मराठी मातीचा लावा ललाटास टिळा

आधुनिक केसरी

**ज्ञानपीठ पुरस्कार विजेते, अग्रगण्य कवी, लेखक नाटककार ,कथाकार व समीक्षक विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांची आज जयंती.२७ फेब्रुवारी १९१२ रोजी त्यांचा जन्म झाला. त्याच्या साहित्यिक योगदानामुळे त्यांचा जन्मदिवस मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव असणारे साहित्यिक , तसेच सरस्वतीच्या मंदिरातील देदीप्यमान रत्न म्हणून त्यांना मराठी साहित्य क्षेत्रात ओळखले जाते. त्यांचे अनेक काव्यसंग्रह, कथासंग्रह,नाटके व समीक्षा ग्रंथ प्रसिद्ध आहेत. मराठी भाषेचे, तिच्या महतीचे वर्णन करताना कवी कुसुमाग्रज म्हणतात**

**माझ्या मराठी मातीचा, लावा ललाटास टिळा**
**हिच्या संगाने जागल्या दऱ्याखोऱ्यातील शिळा**
**हिच्या कुशीत जन्मले, काळे कणखर हात**
**ज्यांच्या दुर्दम धीराने, केली मृत्यूवरी मात**

मराठी भाषेचे थोरपण एवढे मोठे आहे. की तिचा टिळा कपाळी लावावा. तिच्या सहवासाने दऱ्याखोऱ्यातील शिळांनाही जाग येते. तिच्या कुशीत अनेक कणखर हातांनी जन्म घेतला. ज्यांनी आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीने मृत्यूवरही मात केली. अशा आशयाचे वर्णन कवीने या कवितेत केले आहे.पुढे  मराठीपण या कवितेत कवी कुसुमाग्रज म्हणतात, **माझं मराठीपण मी शोधलं सह्याद्रीच्या डोंगरात संतांच्या शब्दात इतिहासाच्या पानात**

कवींना त्यांचे मराठीपण सह्याद्रीच्या डोंगर -दऱ्यांमध्ये, संतांच्या अभंगांमध्ये, व इतिहासाच्या पानापानात दिसते. कुसुमाग्रजांप्रमाणेच इतरही अनेक कवी- कवयित्रींनी मराठी भाषेची थोरवी आपल्या काव्यातून गायली आहे. सुप्रसिद्ध कवयित्री संजीवनी मराठे म्हणतात,

**माय मराठी ! तुझ्या पायी ,तन मन धन मी वाहीयले तुझीया**
**नामी ,तुझीया धामी, अखंड रंगुनी राहियले**
**कष्टामधली तुझीच गोडी, चाखायाची मज आई**
**मला आवडेल तुझा विसावा, तुझीच निर्भय अंगाई**

कवयित्रीने माय मराठीला जणू काही आई मानले आहे. व तिच्या पायी तन-मन धन सारे  अर्पण केले आहे. जणू माय मराठीच्या नामात ती अखंडपणे रंगून गेलेली आहे. माय मराठी हा तिच्यासाठी विसावा वाटतो. व मराठीच जणू काही तिच्यासाठी अंगाई गाते आहे असेही कवयित्रीला वाटते. पुढे कवयित्री म्हणतात,

**माय मराठी ! तुझिया साठी वात होऊनी जळते मी**
**क्षणाक्षणांने कणाकणाने तुझीया स्वरूपा मिळते मी**

कवयित्रीच्या कविता या माय मराठीला समृद्ध करणाऱ्या आहेत. व जशी वात स्वतः जळत राहते पण इतरांना प्रकाश देते. तशी कवयित्री स्वतःच्या कवितेतून जणू काही क्षणाक्षणांने, कणाकणाने माय मराठीच्या स्वरूपात एकरूप होते आहे. अशी भावना कवयित्रीने व्यक्त केली आहे. कविवर्य सुरेश भट यांनी सुद्धा आपल्या लेखणीतून माय मराठीचे गौरव गीत गायले आहे. ते म्हणतात,

**लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी धर्म ,पंथ, जात एक जाणतो मराठी एवढ्या जगात माय मानतो मराठी...** या जगात अनेक भाषा आहेत, परंतु आम्ही खरेच भाग्यवान आहोत की आम्ही मराठी भाषा बोलतो, ऐकतो, व आमचा धर्म जात पंथ सारे काही मराठीच आहे. साऱ्या जगात आम्ही मराठी भाषेलाच आमुची माय माऊली मानतो. अशा आशयाचे वर्णन कवी सुरेश भटांनी केले आहे. परंतू सद्य परिस्थितीत मराठी भाषेची स्थिती पाहता कवीने एक खंत ही व्यक्त केलेली दिसून येते. कवी आपल्या पुढील ओळीत म्हणतात, **पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी, आपूल्या घरात हाल सोसते मराठी, हे असे कितीक खेळ पाहते मराठी, शेवटी मदांध तख्त फोडते मराठी...**    आज मराठी भाषा बोलणारे जरी अनेक असले तरीही मराठी भाषेत शिक्षण घेणाऱ्या नव्या पिढीची संख्या कमी झालेली दिसून येते. आज लोकांच्या डोक्यात इंग्रजी माध्यमांच्या शाळेत आपल्या मुलांना शिक्षण देण्याचे एक नवे खूळ खोलवर रुजलेले दिसून येते. मराठी माध्यमाच्या शाळेत  शिकणाऱ्या मुलांना तुच्छता दर्शक दृष्टीने पाहिले जाते. याचा अनुभव ही मराठी माध्यमांच्या शाळेत शिकणाऱ्या पाल्यांच्या पालकांना अनेकदा येत असतो. मलाही तसा अनुभव अनेकदा आला. माझी तिन्ही मुलं मराठी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेत आहेत. पण मला यात काहीच कमीपणा वाटत नाही.परंतु ही बाब काही पालकांना कमीपणाची वाटते. हीच खंत सुरेश भटांच्या वरील ओळींमधून कदाचित व्यक्त होत असावी. आपल्या महाराष्ट्रात इतर राज्याबाहेरील अनेकांना आधार दिला जातो. अनेक कुटुंब या ठिकाणी उदरनिर्वाहासाठी येतात. व ते कधी महाराष्ट्राचेच होऊन जातात ते त्यांनाही कळत नाही. परंतु असे असले तरीही कळत नकळत त्यांच्याकडून अनेकदा माय मराठीचा अवमान होताना दिसतो. त्यामुळेच सुरेश भटांना असे वाटत असावे की, "**आपूल्याच घरात हाल सोसते मराठी** "    असे असले तरीही...शेवटी मदांध तख्त फोडण्याचे सामर्थ्यही माय मराठीत आहे हेही सांगायला कवी विसरलेले नाहीत.    संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी सुद्धा माय मराठीचे कौतुक केलेले आहे.ते म्हणतात,**माझ्या मराठीची बोलू कौतुके परी अमृतातेही पैजा जिंके।ऐसी अक्षरे रसिके मेळवीन।।१ ।।**

संतश्रेष्ठ ज्ञानदेव म्हणतात, माझ्या मराठीचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे.कारण  अमृताशी पैज जिंकण्याचे सामर्थ्य माझ्या मराठीत आहे. तीच्या एका -एका अक्षरात तेवढी गोडी भरलेली आहे.

**प्रा.सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे,**
**चोपडे, परभणी. मो .९८२३०६६६०६**
**(मराठी साहित्याच्या अभ्यासिका)**

# बुद्धाचे दैविकरण केल्याने धर्म वाढतोय काय ?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300


आधुनिक केसरी

**भारतच नव्हे तर जगाच्या पाठीवर कुठे ही गेले तर बुद्धाच्या विचारावर चालणारे लोक आहेत. जगामध्ये बुद्ध धम्माचा प्रचार आणि प्रसार झालेला होता. म्हणुनच वेगवेगळ्या ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे बुद्ध हे विश्वव्यापी होते याची प्रचिती येते. तथागत गौतम बुद्ध कोणत्याही एका व्यक्तीची, समुहाची वा धर्माची वैयक्तिक संपत्ती मुळीच नाही. जो समता स्वातंत्र्य बंधुता न्याय मानवी स्वातंत्र्य विज्ञानवाद, स्विकारून चारित्र्याचे पालन करतो तो बुद्धांचा अनुयायी होतो. बुद्धांचा अनुयायी होण्यासाठी कोणत्याही कर्मकांडाची होम हवनाची गरज नाही. तथागत गौतम बुद्ध म्हणजे अखिल विश्वाला आदर्श जिवन जगण्याचा मार्ग दाखवणारे तथागत बुद्ध आहेत.**

कोणत्याही चमत्काराने किंवा मंत्रोच्चार करून ते अडचणी सोडवत नाहीत तर अडचणी निर्माण होण्याचे कारणे आणि उपाय याचे सांगणारे तथागत बुद्ध आहेत.

जगामध्ये कोणत्याही ठिकाणी उत्खनन झाले तर तथागत गौतम बुद्धाच्या मुर्त्या व इतर बौद्ध कालीन वास्तु सापडतात यावरून जगामध्ये बुद्धाचा किती मोठा प्रभाव आहे हे दिसुन येते. भारतात देखील अनेक ठिकाणी ऐतिहासिक व जगप्रसिध्द बौद्ध लेणी आहेत त्यामध्ये मोठमोठ्या बुद्धमुर्ती व तत्कालीन संस्कृती चे वर्णन होईल असे शिल्प कोरलेले आहेत. सम्राट अशोक यांनी देशामध्ये चौऱ्यांशी हजार स्तुप बांधून बुद्धाच्या धम्माचा प्रसार आणि प्रचारच केला नाही तर तो ऐतिहासिक वास्तुने जिवंत सुद्धां ठेवला. मुळ मुद्दा हा आहे. की बुद्ध प्रत्येक ठिकाणी आजही आढळतात. उत्खनन केले की बुद्धच सापडतात. कपट नितीने बुद्ध स्तुप, शिल्प तोडून ते गाडण्याचा प्रयत्न झाला असला तरी बुद्ध हे झाकणारे नाहीत. एकीकडे बुद्धाचे नाव व विचार न घेता बुद्धाचा मुर्तीला शेंदूर फासुन, त्यावर कपडे टाकुन मुकुट लाऊन बुद्धाला देव बनवले जाते आणि त्याची पुजा केली जाते. पुजा अर्चा करण्याचा अधिकार संविधानाने दिलेला आहे धर्मानुसार ते करायला ही पाहिजे. परंतु बुद्धाची देव म्हणून पुजा करणे हा अधिकार मात्र कोणालाच नाही. कुठे ब्रम्हबाबा तर कुठे देवी म्हणून पुजले जाते. पुर्वीच्या काळी बुद्ध विहारांचे किती मंदिरात बनवून देव बनवले असते ते सोडा पण आजच्या या काळात प्रसारमाध्यमे, ऐतिहासिक पुरावे असताना ही बुद्धाची देव म्हणून पूजा करताना धर्म धोक्यात येत नाही का ? तेहतीस कोटी देव असताना आजही बुद्धाच्या मुर्तीची गरज का पडते ? एवढे आपले अज्ञान आहे की लोकांना बुद्ध कळूच नये म्हणून त्यांचे दैविकरण केले जाते. बुद्धाचे अनेक ठिकाणी वेगवेगळ्या नावाखाली वेगवेगळ्या देवांचे नाव देऊन पुजा केली जाते. असे कृत्य करताना ज्यांना धर्माचा गर्व आहे त्यांना काहीच वाटत नाही. जे देव आणि माणसे याच्या मधले दूत आहेत तेही काही बोलत नाही. धर्माचा गर्व आहे तर स्वतः च्या धर्मातील देवांनाच पुजा ना बुद्धाला देव बनवून त्याची पूजा करणे यात कोणता गर्व आहे ? अंधश्रद्धेत डुबलेली जनता आणि देव यांच्या मध्ये जो दुत आहे त्याने बुद्धालाच देव म्हणून पुजले तर खरा देव त्या पुजाऱ्यावर कोपणार नाही का ? बुद्धाची मुर्ती आणि नाव ब्रम्हबाबा, देवी, शिवलिंग असे देऊन पूजा केली जाते तेव्हा ब्रम्हबाबा, देवी, शिवलिंग यांचा अवमान होत नाही का ? देवासोबत नेहमी संबंध असणाऱ्या पुजाऱ्यांना देव कधीच सांगत नसतील का अरे तुम्ही बुद्धाच्या मुर्तीची पुजा करता आणि माझ्या नावाने चंदा गोळा करता हे धर्माच्या विरोधी आहे असा संदेश देव देत नसतील का ? अनेक लोकांकडे दिव्यशक्ती आहे ती दिव्यशक्ती धर्माचे रक्षण करण्यासाठी दिली आहे असे त्यांचे मत असते मग बुद्धाची चोरी करून देव बनवतात तेव्हा या दिव्य पुरुषांना देवाचा एकही संदेश येत नाही का ? धर्माचे रक्षण करण्यासाठी तुम्हाला मी शक्ती दिली आणि तुम्ही धर्माचे व देवाणे रक्षण न करता बुद्धालाच देव बनवले असा प्रश्न देव विचारत नसतील का ? स्वतः धर्माच्या व देवाच्या नावाखाली बुद्धाच्या मुर्त्या चोरायच्या आणि वरून धर्माची प्रामाणीकतेची शिकवण द्यायची. इतर बुद्धाच्या मुर्तीला देवदेवतांची नावे देऊन त्याची पुजा करण्याची गरजच का पडावी ? प्रबोधनकार ठाकरे यांच्या मतानुसार देव व देवळे सात व्या आठव्या शतकात निर्माण झाली मग त्याअगोदर देव होते तरी कुठे आणि सातव्या आठव्या शतकात मंदीराचे निर्माण कसे झाले याचे स्पष्टीकरण तेच स्वतः देतात कि बुद्ध धम्मातील हिनयान पंथाच्या लोकांनी विहारे बांधून त्यात बुद्धमुर्ती व शिल्प बसवले परंतू धर्मांध व धम्म विरोधी लोकांनी त्याची नासधूस केली आणि त्याचेच देऊळ तयार केले बुद्ध मुर्तीला च शिवलिंग व शंकर म्हणून पुजा करू लागले म्हणून प्रबोधनकार ठाकरे म्हणतात देवळाचा ईतिहास शोधला तर तो विहारात बिनचूक मिळतो याचाच अर्थ विहाराची देवळे बनवली. बर ईतिहासामध्ये जे काही केले ते होऊ द्या पण आता आजही बुद्धाची मुर्ती देव म्हणून पुजने हे बुद्धी, तर्क व धर्म यांना शोभणारे आहे का ? एखाद्या रंगामुळे धर्माचा अवमान होतो तर धर्माने देव नसलेली मुर्ती देव म्हणून पुजली तर धर्मचा अवमान नाही का ? बुद्धाला देव म्हणून पुजताना धर्मरक्षक, दैवी शक्ती वाले चमत्कारिक लोक, देवाचे दुत हे नेमके असतात तरी कुठे ? पुजा कोणाचीही करा परंतु देवाच्या नावाने दान मात्र पुजाऱ्यांना च द्या या साठीच तर बुद्धाच्या मुर्तीचा वापर केला जात नाही ना ? सर्व धर्मांना एक तत्व असते एक पावित्र्य असते. परंतु जेव्हा आपला धर्म किंवा धर्माचे तत्व चांगले आहे असे म्हणतो आणि धर्मात नसलेल्या मुर्तीची पुजा करतो तेव्हा धर्म आणि त्याचे तत्त्वज्ञान, देव आणि देवाची भक्ती हे सांगुन काय फायदा आहे का ?

आपण आताचा विचार केला तर सध्या ही कुठे ना कुठे बुद्ध मुर्तीला देव म्हणून पुजले जात आहे. मागे अंजिठा लेणीवर देखील तसा प्रयोग करण्यात आला. बुद्ध मुर्तीला कुंकू लाऊन तेथे त्रिशुळ ठेवण्यात आली होती. मुळात असे करणाऱ्या लोकांवर देव कोपत नाही का ? अशा लोकांना देव लवकर घेऊन जात नाही का ? कारण असे करणारे लोक एकाच धर्माचा नाही तर एक धर्म एक एक धम्म आणि देव असा तिन लोकांचा अवमान करतात. तिन तिन संवेदनशील बाबींचा अवमान करणाऱ्या लोकांना कोणत्याही धर्माच्या लोकांनी सन्मान करणे योग्य आहे का ? धर्मतत्वानुसार व माणुसकी नुसार बुद्धाची मुर्तीची देव म्हणून पुजा करणे चुकिचेच आहे.



अजिंठा एक प्रकरण झाले. दुसरे प्रकरण म्हणजे मुंबई येथील कान्हेरी लेणीवर बुद्धाच्या मुर्तीला शंकर मुर्ती समजून पुजा करत होते. जेव्हा जानकर लोकांनी आवाज उठवला तेव्हा या वेळच्या महाशिवरात्रीला पोलीसांनी लोकांना सांगितले कान्हेरी लेणीवर कोणत्याही प्रकारचे शिवमंदिर वा शिवलिंग नाही महाशिवरात्रीला कोणत्याही प्रकारच्या पुजेचे साहित्य आणु नये. तेव्हा पुजेला आवर घालता आला पण धर्माच्या पावित्र्याचे काय ? स्वतः च्याच हाताने स्वतः च्याच धर्माचा अवमान करून घेण्यात काय शहाणपण आहे. या अगोदर चेन्नई न्यायालया मध्ये सेलन जिल्ह्यातील एक केस गेली होती तेथेही जुन्या मंदीरामध्ये तथागत बुद्धाच्या मुर्तीची देवसमजुन पुजा केली जात होती. चेन्नई उच्चन्यायालयाने चौकशी चे आदेश दिले पुरातत्व खात्यांनी अहवाल सादर केला आणि अहवालानुसार ती मुर्ती बुद्धाची असून तेथे पूजाअर्चा करता येणार नाही असा निर्णय दिला. देवाला कोर्टात नेने आणि तेथे देवाची हार करून घेणे हे कोणत्याही धर्माला शोभणारे नाही. सोमनाथ मंदीराखाली तिन मजली गुफा आढळून आली आणि गुफेमध्ये बुद्धशिल्प व लेणी सदृश्य बाबी आढळून आल्याचा अहवाल पुरातत्व खात्याने सरकारला दिलेला आहे. मग आता ही केस जर कोर्टात गेली आणि अयोध्ये सारखा निकाल लागला तर मंदिर पाडून विहार बांधावे लागेल नाही तर मंदिर जसेच्या तसे पण तेथे धर्मानुसार पुजा अर्चा करता येणार नाही. भुदरगड किल्या जवळ आता पुन्हा बौद्ध गुफा व शिल्प असल्याचे संशोधनात समोर आले आहे. हा देशच नाही जग बुद्धाचे आहे म्हणून सर्वत्र बुद्ध आढळतो. परंतु स्वतः च्या डोक्यातील मेंदूचा वापर न करता धर्मांध होऊन, अंधश्रद्धा बाळगून बुद्धाला देव म्हणून पूजने आणि नंतर तो देव नसुन बुद्ध आहे असे सिद्ध झाल्यावर पुजा बंद करणे असे केल्यापेक्षा आपण जर मेंदुचा वापर करून सत्य असत्यामधला फरक केला, आणि धर्मांध होऊन धर्माचा गर्व न करता डोळस व तार्किक दृष्टीने बघितले तर मान खाली घालायची वेळ येणारच नाही. बुद्धाच्या मुर्तीला देव म्हणून पुजताना, देवाच्या नावाने दान देऊन पुजाऱ्याला श्रीमंत करताना छाती फुगुन येते. परंतु बुद्धाला बुद्ध म्हणून स्विकारून त्यांचे नाव घ्यायची लाज वाटते. म्हणजे आपण धर्माच्या नावाखाली काय काय सहन करतो. परंतु माणूस म्हणून ज्याचा स्विकार करायला पाहिजे त्याचा स्विकार करत नाही आणि यातुनच आपला बौद्धिक विकास व धर्माच्या बाबतील अंधश्रद्धा दिसुन येते. अनेक लोक जे धर्माच्या नावावर पोट भरतात ते म्हणतात आमच्या च धर्माच्या नावाने किंवा धर्मातील चुकीच्या गोष्टी वर का बोलले जाते. आता बुद्ध मुर्तीला देव म्हणून पुजले गेले आणि कोणी बोलले तर तो धर्मविरोधी होणार का ? किंवा एखाद्या ठिकाणी बुद्धमुर्तीला देव समजून पुजा केली जाते शिवलिंग समजून पुजा केली जाते आणि ते जर बुद्ध असतील तरी काहीच बोलायचे नाही का ? तुम्हाला देवाच्या नावाखाली बुद्धाची पुजा करायला काहीच वाटत नाही पण बुद्धाला बुद्ध म्हणल्यावर राग का येत असावा. अशा प्रकारे अनेक प्रश्न आहेत. आणि अनेक ठिकाणी बुद्ध मुर्तीला देव म्हणून पुजले जाते याचाच गर्व वाटत असेल तर बुद्धाला ज्या देवाचे नाव दिले त्या देवाला काय वाटत असेल याचा विचार करावा. आणि देशात बंधुभाव नांदावा परंतु ऐतिहासिक वास्तुचे विद्रुपीकरण होऊ नये या साठी प्रत्येकाने प्रयत्न करावा. फक्त बुद्धमुर्तीला देव म्हणून पुजले तर धर्म वाढणार नाही. धर्माचे पावित्र्य जपुन व मानसन्मान सुद्धा करता आला पाहिजे.

# १२ वी च्या परीक्षेतील गोंधळ



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**बोर्डाच्या परीक्षा या विद्यार्थ्याच्या दृष्टीने महत्वाच्या असतात.त्या सुरू झाल्या अन् पहिल्याच इंग्रजीच्या पेपरात ६ गुणाचे तीन प्रश्न चुकीचे छापले गेले! प्रश्न पत्रिका तयार करण्याची एक ठराविक शिस्तबध्द प्रक्रिया असते.एकापेक्षा जास्त संच तयार ठेवणे, आलेली प्रश्न पत्रिका तज्ञांकडून तपासून घेणे, त्यातली भाषा,प्रश्नाचे स्वरूप यात काही चूक राहू नये म्हणून मोडरेशन करणे,छापण्या पूर्वी, नंतर चुका राहू नयेत याची दक्षता घेणे, अशी ठरलेली प्रक्रिया असते.**

मग असे असताना चुका का राहतात ? याला जबाबदार कोण आहेत ? त्यांना काय शिक्षा होणार आहे ? खरे तर अशा हलगर्जी शिक्षकाची नावे जाहीर करायला हवीत. पोलीस गुन्हेगारांना पकडल्या नंतर त्यांना परेड ने टी व्ही वर दाखवतात. इथे तर हे बेजबाबदार शिक्षक( अथवा अधिकारी,कर्मचारी ), लाखो विद्यार्थ्याच्या भविष्याशी खेळताहेत.ते मोकाट कसे काय सुटू शकतात ? आता बोर्डाने सर्व विद्यार्थ्यांना सरसकट ६ गुण देण्याचे ठरविले आहे. ही तर गुणाची उधळपट्टी झाली. न सोडविलेल्या प्रश्नाला पूर्ण गुण देणे हे हास्यास्पद आहे.परदेशातील दर्जेदार शाळा ना हा निर्णय कळला तर ते हसतील. प्रश्न चुकीचा आहे एव्हढे लिहून विद्यार्थ्याने पुढील प्रश्नाकडे जाणे खरे तर अपेक्षित आहे.तेव्हढी अक्कल बारावीच्या विद्यार्थ्यांना असायलाच हवी.हवे तर अशा परिस्थितीत काय करायचे या सूचना आधी बोर्डाने द्यायला सुध्धा हरकत नाही.( आपण चुका करतो हे गृहित धरून! ).६ गुणाचे प्रश्न चुकीचे होते तर ९४ पैकी गुण द्यायचे १०० ऐवजी.ते सूत्र वापरणे संगणाकाच्या जमान्यात फारसे कठीण नाही.त्याने कुणावर अन्याय देखील होत नाही. त्याने रिझल्ट वर परिणाम देखील होणार नाही. पण असे सरसकट गुण दान करणे म्हणजे पुढेही असेच दान मिळण्याची सवय लागण्यास हातभार लावणारे आहे.



एकदम चुकीचे आहे.आजकाल दहावी,बारावी च्या बोर्डाच्या प्रश्न पत्रिकेचे स्वरूपच हास्यास्पद असते. त्यात कसलेही चॅलेंज नसते. विचाप्रवर्तक आव्हान नसते.ठोकळेबाज प्रश्न,कोणत्या भागावर किती मार्काचे ,कशा पद्धतीचे प्रश्न द्यायचे हे देखील ठरलेले! म्हणजे पु ल देशपांडे विनोदाने म्हणत त्यानुसार ज्ञानेश्वर पाच मार्काचे ,अन् तुकाराम चार गुणांचे अशी विभागणी!मागे अच्युत गोडबोले यांनी मला बारावीचाच एक पेपर पाठविला होता. त्यात त्याच्याच धड्यातील एक परिच्छेद दिला होता.ज्यात त्यांनी लहानपणी कोणती पुस्तके वाचली,त्यांच्यावर कोणत्या व्यक्तीचा प्रभाव पडला हे दिले होते.अन् खाली प्रश्न असेः गोडबोले यांनी लहानपणी कोणती पुस्तकं वाचली ? गोडबोले यांच्यावर कुणाचा प्रभाव पडला ?

या अशा निरर्थक प्रश्नातून आपण कोणते ज्ञान,कोणती शिकवण टेस्ट करतो आहोत ? हेच कळत नाही. परीक्षेचे नेमके उद्दिष्ट काय ? तुम्हाला नेमके काय तपासायचे आहे ?विद्यार्थ्याचे कुठले आकलन शोधायचे आहे ? जे शिकवले,जसे शिकवले तसेच परीक्षेत उतरविणे म्हणजे परीक्षा घेणे नव्हे. विद्यार्थी एखाद्या प्रश्नाचा वेगळा,स्वतंत्र विचार करू शकतो का ? जे शिकवले त्याचा वेगळ्या पद्धतीने वापर करू शकतो का, वेगळे पण तर्कशुध्द उत्तर अपेक्षित हवे.साधे सोपे उदा द्यायचे तर तुम्ही दुकानात दोनशे रुपयाचे सामान विकत घेतले.पाचशे ची नोट दिली. किती पैसे परत मिळतील ? हा झाला सरधोपट प्रश्न.तीनशे रुपये उत्तर दिले की मिळाले दोन गुण! हाच प्रश्न चॅलेंजिंग करायचा तर असा बदल करू शकतोः दोनशे चे सामान घेतले,पाचशेची नोट दिली,तर दुकानदार वेगवेगळ्या नोटात ( म्हणजे पाच, दहा,वीस, पन्नास,शंभर,दोनशे च्या नोटात ) उरलेले पैसे किती पद्धतीने परत करू शकतो ? या उत्तरात आव्हान आहे,कल्पकता आहे,विचार करायला संधी आहे.मुख्य म्हणजे अनेक उत्तरे आहेत या एकाच प्रश्नाची! ( हे मी कल्पनेने हवेत लिहिलेले नाही. परदेशातील शाळेत असेच प्रश्न मुलांना विचारतात. तिथे पाठांतर किती हे बघत नाहीत. मुलांची स्वतंत्र विचार करण्याचं कौशल्य तपासतात.

आपल्याकडे देखील नव्या शैक्षणिक धोरणात खरे तर हेच,असेच अपेक्षित आहे.पण गुणदान करून स्वतःची चूक झाकण्यात,हात झटकण्यात समाधान मानणाऱ्या बोर्डाच्या अधिकाऱ्यांना,अन् ठोकळे बाज प्रश्न, त्यांची ठोकळेबाज उत्तरे यांची सवय झालेल्या शिक्षकांना कुणी समजवायचे ?

# कुसुमाग्रजांचे साहित्य शाश्वत जीवनमूल्याची पेरणी करणारे

## प्रा. डॉ. सतीश मस्के : कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य महाविद्यालयात कुसुमाग्रज जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळनेर :** कवी कुसुमाग्रज यांच्या साहित्याची प्रेरणा ही क्रांती आहे. कुसुमाग्रज यांचे साहित्य समाजनिष्ठ आहे व शाश्वत मूल्याची लेखनीच्या माध्यमातून समाजात पेरणी करणारे आहे असे मत महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राभारी प्राचार्य प्रा.के.डी.कदम हे होते. यावेळी विचार मंचावर प्रा.एल.जे.गवळी,प्रा. डॉ. डब्ल्यू बी शिरसाट व प्रा. डॉ. संजय खोडके आदि उपस्थित होते.

कर्म.आ.मा.पाटील कला, वाणिज्य व अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात थोर, श्रेष्ठ साहित्यिक, कविवर्य वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त 'मराठी भाषा गौरव दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना प्रा. डॉ. सतीश मस्के म्हणाले की, कुसुमाग्रजांच्या साहित्यातून मानवी मूल्य व जीवनमूल्य सतत प्रवाहित होत असत. त्यांनी आपल्या साहित्यातून शाश्वत मूल्याची पेरणी केलेली दिसून येते. प्रेम, करुणा, प्रामाणिकपणा, सत्य, अहिंसा, बुद्धीप्रामाण्यवादी, विज्ञानवादी दृष्टिकोन, विवेक, स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या शाश्वत मूल्यांची पेरणी करत करत सामाजिक अन्याय, अत्याचार व विषमतेविरुद्ध आपली लेखणी चालवून साहित्य प्रगल्भ केले म्हणूनच त्यांना ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांनीही साहित्याचे वाचन करून संस्कारशील बनून जीवनमूल्य आपल्या अंगी बाळगायला हवेत. अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य प्रा.के.डी. कदम म्हणाले की, विद्यार्थ्यांनी साहित्याचे वाचन करायला हवे. त्यातून संस्कार घेऊन समाजशील व सामाजिक बांधिलकी स्वीकारायला हवी. साहित्यातून माणूस घडत असतो. मराठी भाषा ही व्यक्तिमत्व विकास साधणारी भाषा आहे. भाषेच्या माध्यमातून




विद्यार्थ्यांनी आपले जीवन घडवायला हवे. यावेळी प्रा. एल.जे.गवळी यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी मराठी भाषेकडे, लेखनाकडे, वाचनाकडे लक्ष द्यायला हवे. आपले शुद्धलेखन शुद्ध व वळणदार लिहायला हवे. विविध साहित्यिकांच्या साहित्यकृतीचा दाखला देत विद्यार्थ्यांनी त्यांचे वाचन करून आपल्या जीवनात बदल करायला हवा. कार्यक्रमाचे आभार, सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा.एल.जे.गवळी यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विद्यार्थी ,प्राध्यापक आणि प्राध्यापकेतर कर्मचारी बहुसंख्य उपस्थित होते.



# जिल्हा परिषद शाळेत पालक मेळाव्यात विद्यार्थ्यांनी घेतली कॉपीमुक्तीची शपथ

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील जिल्हा परिषद शाळेत पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते इयत्ता दहावीच्या परीक्षेत कॉपी करणार नाही अशी शपथ विद्यार्थ्यांनी पालकांच्या पायावर नतमस्तक होऊन घेतल्याने आता खरी परीक्षा विद्यार्थ्यांची ठरणार आहे हे विशेष.

जिल्ह्यात बाजार सावंगी ची जिल्हा परिषद शाळा सर्व शैक्षणिक स्तरावर नंबर एक ठरलेली असून शैक्षणिक कुठल्याही उपक्रमात नंबर एक वरच आहे जिल्ह्यात येथील शाळेत सतत कॉपीमुक्त परीसुचलीक्षेत उच्चस्तरीय टक्केवारीच वरच आहे अशात येथील जिल्हा परिषद शाळेत पालक सभा बोलविण्यात आली होती यात पालकांनी भरून प्रतिसाद दिला यात मुख्याध्यापक दहिफळे यांना सुंदर कल्पना सुचली व त्यांनी विद्यार्थी प्रत पालकांचा सन्मानासाठी व खरोखरच परीक्षा कॉपीमुक्त करायची म्हणून विद्यार्थ्यांनी पालकांच्या पायावर नतमस्तक होऊन झालेल्या चुका व पुढे चुका न करण्याचा तथा कॉपीमुक्त परीक्षा देणार म्हणून शपथ घेतली त्यामुळे पालकांचे डोळे भरून आल्या तर सर्वत्र कौतुक होत आहे मुख्याध्यापक हरिभाऊ दहिफळे परदेशी पटेल सरकाथार सर,सुरडकर सर,निफाडे मॅडम,खंडाळे सर,पुरी सर,महाडकर सर,धुमाळ सर व शिक्षक वृंद पालक यांच्या उपस्थित कार्यक्रम संपन्न झाला.

# आयत्या पिठावर रेघोट्या ओढणे बंद करा; आ. लंकेचा खासदार विखेंना टोला


आधुनिक केसरी न्यूज

**नगर :** तालुक्यातील वाकोडी- वाळूंज रस्त्याच्या ३ कोटी रूपयांच्या कामाला मंजूरी मी आणली. गेल्या आठवड्यात वाकोडी येथे या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन मात्र खासदार डॉ. विखेंनी केले. स्वतःची कामे दाखवा, त्यांचे भूमिपूजन आणी लोकार्पण करा, इतरांच्या आयत्या पिठावर रेघोट्या ओढण्याचे काम बंद करा असा टोला नगर- पारनेर विधानसभेचे आमदार निलेश लंके यांनी वाकोडी येथे खासदार डॉ. सुजय विखे यांना लावला आहे. ल वाकोडी फाट्याकडून वाकोडी कडे जाणाऱ्या रस्त्यावर एमआयआरसी जवळील रस्त्यावर दोन कोटी रूपयांच्या पूलाचे भूमिपूजन तसेच ९० लाख रूपयांच्या प्राथमिक उपकेंद्राच्या इमारतीचे लोकार्पण या वेळी करण्यात आले. ते यावेळी वाकोडी येथे आमदार लंके बोलत होते. या वेळी दादा कळमकर,प्रताप शेळके, संदेश कार्ले, बाळासाहेब हराळ, पंचायत समितीचे प्रवीण कोकाटे, प्रशांत गायकवाड, राष्ट्रवादी कॉंग्रेसते तालुका प्रमुख रोहिदास कर्डिले, प्रकाश पोटे प्रियंका लामखडे यांच्यासह तालुक्यातील महाअघाडीचे पदाधिकारी उपस्थीत होते. प्रारंभी सचिन तोडमल यांनी वाकोडीचे विविध प्रश्न मांडले त्यास भाऊसाहेब कराळे यांनी अनुमोदन दिले, रमेश इनामकर, अमोल तोडमल, भाऊसाहेब मोढवे, शनैश्वर पवार, प्रदिप पवार, अमोल गोरे या ग्रामस्थांच्या हस्ते पाहुण्याचां सत्कार करण्यात आला.



# डॉ. गजानन सानप व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून नियुक्त

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्यांच्या नियुक्त्या महामहिम राज्यपाल यांच्या वतीने करण्यात येते, त्यांच्या वतीने दहा सिनेट सदस्य व दोन व्यवस्थापन परिषद सदस्य यांचे नियुक्ती महामहिम राज्यपाल हे करत असतात, राज्यपालाचा विशेष प्रतिनिधी म्हणून प्रा. डॉ. गजानन सखाराम सानप यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मॅनेजमेंट कौन्सिल च्या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. सोमवारी गजानन सानप यांना राजभवन मधून नियुक्तीचे पत्र मिळाले,गजानन सानप हे अखिल भारतीय विद्यार्थी परिषद चे कार्यकर्ते असून सध्या विद्यापीठ विकास मंचाचे महाराष्ट्राचे राज्य सचिव असे जबाबदारी आहे. एम एस सी ऑरगॅनिक केमिस्ट्री तसेच एम फिल , पीएचडी पर्यंत शिक्षण त्यांनी घेतलेला आहे , शहरातील प्रसिद्ध अशा सरस्वती भुवन विज्ञान महाविद्यालय येथे मागील सोळा वर्षापासून ते अध्यापनाचे कार्य करतात. छत्रपती संभाजी नगर शहराचे ते विद्यार्थी परिषद चे शहर मंत्री, विद्यापीठ प्रमुख, जिल्हाप्रमुख शहराध्यक्ष ते आता महाराष्ट्र प्रदेश सचिव तसेच राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य असा त्यांचा मागील तीस वर्षापासून चा सामाजिक व शैक्षणिक, विद्यापीठ क्षेत्रामध्ये काम करण्याचा प्रदीर्घ अनुभव आहे, विद्यापीठ कायद्याचा सविस्तर अभ्यास व कायद्याबद्दल सविस्तर जाण असणारे ते एक कार्यकर्ते आहेत. विद्यापीठ आयोजित केंद्रीय युवक महोत्सवात, क्रीडा महोत्सव , तसेच राजभवन आयोजित इंद्रधनुष्य, युवा महोत्सवाचे त्यांनी अनेक वर्ष यशस्वी आयोजन केले आहे.

# कोणतीही संधी नाकारू नका : अॅड.आकाश आढाव

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** तुम्हाला जे वाचायला मिळेल ते वाचलं पाहिजे. आयुष्यातील आलेली कोणतीही संधी नाकारू नका.संधीचे सोने करा.संधी मिळाली नाही तर ती खेचून आणण्याची आपली तयारी असली पाहिजे.आपल्या आयुष्यात संघर्ष खूप असून संघर्ष केल्या शिवाय आपल्याला काहीच मिळत नाही.असे प्रतिपादन कवी व लेखक अॅड.आकाश आढाव यांनी केले.तसेच भूतकाळात अडकू नका.भविष्याचा विचार करू नका वर्तमान काळावर विशेष लक्ष केंद्रीत केल्यास भविष्यकाळ हा आपोआप चांगला होईल.आत्महत्येच्या आहारी जाऊ नका आईवडिलांशी आणि गुरुवर्यांशी सुसंवाद वाढवा. गुगलचा वापर शिक्षणासाठी करा. यश मिळविण्यासाठी कष्ट करा. मराठी भाषेला नेहमी प्रथम स्थान द्या. नंतर बाकीच्या भाषांचा अभ्यास करा. त्याचाही तुम्हाला भविष्यात फायदा होईल, असे कवयित्री व शोध अस्तित्वाचा या पुस्तकाच्या लेखिका प्रा.प्रतिक्षा आढाव यांनी म्हटले. ते दोघे ही लोणंद, ता.खंडाळा येथे आयोजित करण्यात आलेल्या मराठी राजभाषा दिन व कुसुमाग्रज यांच्या जयंती कार्यक्रमात बोलत होते. विद्यार्थ्यांच्या गणवेशावरून अॅड.आकाश आढाव म्हणाले की तुम्हाला खूप कमी वयात शिस्त आणि भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी इथले वातावरण पोषक आहे नाहीतर मला काळा कोट घालण्यासाठी खूप मोठा प्रवास करावा लागला आहे.यावेळी ब्ल्यु डायमंडचे अध्यक्ष जगन्नाथ शेंडगे व इतर उपस्थित होते.साहित्यिकांचा गौरव होणे गरजेचे असल्याने गौरव साहित्य क्षेत्राचा,गौरव मराठी भाषेचा या वाक्या प्रमाणे युवा दांपत्य साहित्यिकांचा सन्मान हा पुस्तक देऊन करण्यात आला.यावेळी दोघांनी केलेले मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मोलाचे ठरले.इयत्ता नववी तील वेदांत शिंदे या विद्यार्थ्यांने सुद्धा भाषण केले.सूत्रसंचालन सुषमा शेळके यांनी केले तर मान्यवरांचा परिचय देताना सुशिल गायकवाड यांनी चारोळी सुद्धा सादर केली.

# राष्ट्र विकासात रासेयोची महत्त्वाची भूमिका : प्रा. डॉ. देशमुख

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** येथील गोदावरी कला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष सात दिवसीय शिबीर दि. २७ फेब्रुवारी ते ०५ मार्च २०२३ दरम्यान संपन्न होत आहे. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी उद्घाटक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे रासेयो संचालक डॉ. आनंद देशमुख बोलत होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून योगेश चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक, अंबड यांची उपस्थिती लाभली होती. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार हे होते. उद्घाटक डॉ. देशमुख आपल्या मार्गदर्शनात पुढे म्हणाले की, "रासेयोची सुरुवात ज्या हेतूने झाली, तो हेतू युवकांनी समजून घेऊन जीवन आचरण केले पाहिजे. लोकशाही समृद्ध करण्यासाठी युवकांनी



क्रमिक अभ्यासासोबतच कायद्याचे ज्ञान देखील आत्मसात करावे. कारण आपले कायद्याचे अज्ञान हेच सत्ताधारी वर्गाचे हितसंबंध आणखी मजबूत करत असते. आपणास जर कायदेविषयक ज्ञान असेल तर आपणास कोणी फसवू शकणार नाही. एवढेच नव्हे तर आपल्या कायद्याच्या अज्ञानामुळे आपणास माफी द्यावी, असे देखील आपण म्हणू शकणार नाही. रासेयोचे विशेष शिबीर आणि वर्षभर चालणारे विविध उपक्रम यातून विद्यार्थ्यांना विविध पैलूंचे ज्ञान होऊन एका आदर्श नागरिकाची निर्मिती या माध्यमातून होत असते. सामाजिक आणि राजकीय वातावरण दिवसेंदिवस गढूळ होत आहे. यावर फक्त युवकच तोडगा काढू शकतात. रासेयो हे बिघडलेल्या सामाजिक वातावरणावरील उपाय शोधण्याचे आणि अंमलबजावणी करण्याचे काम करते." असे भावपूर्ण उद्गार डॉ. आनंद देशमुख यांनी या प्रसंगी काढले. प्रमुख पाहुणे योगेश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासासोबत स्पर्धा परीक्षेची तयारी करावी आणि जीवनात यशस्वी व्हावे या पद्धतीने मार्गदर्शन केले. शिक्षण दिवसेंदिवस महाग होत असताना गरीब घरातील मुलांनी स्पर्धेच्या माध्यमातून आपली गुणवत्ता सिद्ध केली तर आपले पालक, गाव आणि पर्यायाने राष्ट्राचा नक्की विकास होईल, असा आशावाद त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला.अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार यांनी शिबिरार्थ्यांना समयोचित मार्गदर्शन केले. त्यामुळे गरीब घरातील मुलांनी विनाकारण ओशाळून न जाता, संकोच न करता जिद्दीने अभ्यास करावा व स्वप्न साकार करावे, असे भावोद्गार या प्रसंगी काढले.

# मराठी भाषेचा सन्मान होण्यासाठी साहित्यिकांनी झटावे

## संमेलनाध्यक्ष प्रा. डॉ. शोभाताई रोकडे : गुरुकुंजात पहिले सातपुडा साहित्य संमेलन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** साहित्यिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या संवेदना बहुद्देशीय संस्था संचालित सातपुडा साहित्य परिषदेचे वतीने आयोजित पहिले राज्यस्तरीय सातपुडा साहित्य संमेलन 26 फेब्रुवारी रोजी अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी येथील गुरुकुल आध्यात्म केंद्राच्या सभागृहात अतिशय उत्साहात पार पडले. या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ख्यातनाम साहित्यिका प्रा. डॉ.शोभाताई रोकडे व स्वागताध्यक्ष म्हणून जेष्ठ साहित्यिक व माजी सिव्हिल सर्जन श्री श्यामसुंदर निकम, उदघाटक म्हणून माजी शिक्षणाधिकारी श्री पंडितजी पंडागडे तर प्रमुख अतिथी म्हणून राजीवजी ठाकूर व गुरुकुल आध्यात्मचे संचालक श्री रवी मानव तथा संवेदना बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष गजानन काकडे उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय भाषणातून प्रा.डॉ.शोभाताई रोकडे यांनी मराठी भाषेतून नव्या दमाचं साहित्य निर्माण होत असून अशीचं नवनिर्मिती होत राहण्यासाठी मराठी भाषेला अधिक समृद्ध करणे गरजेचे आहे.म्हणूनचं मराठी भाषेचा आदर आणि सन्मान व्हावा, यासाठी साहित्यिकांनी झटत राहावे असे आवाहन त्यांनी केले.

संवेदना बहुद्देशीय संस्थेद्वारा संचालित सातपुडा साहित्य परिषद ही महाराष्ट्रातील प्रतिष्ठित व नामांकित अशी संस्था असून,या संस्थेच्या वतीने वर्षभर विविध साहित्यिक,सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते.त्याचाच एक भाग म्हणून पहिले सातपुडा साहित्य संमेलन रविवार २६ फेब्रुवारी रोजी अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज मोझरी येथील गुरुदेव अध्यात्म केंद्राच्या सभागृहात पार पडले. संमेलन स्थळ ते समाधीस्थळ अशी ग्रंथदिंडीने संमेलनाला सुरुवात झाली त्यानंतर संमेलनाचे उदघाटन,प्रतिमा पूजन,दीप प्रज्वलन, संकल्पगीत,स्वागतगीत,मान्यवरांचे स्वागता नंतर प्रमुख मान्यवरांचा थोडक्यात परिचय संस्थेचे सदस्य विशाल कन्हेरकर यांनी करून दिला.त्यांनतर संवेदना बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक,सचिव सुयोग



राजनेकर यांनी आपल्या प्रास्ताविकातून संस्थेचा व संमेलनाच्या पार्श्वभूमीचा थोडक्यात आढावा घेतला.त्यानंतर सत्कार व पुरस्कार वितरण तथा पुस्तक प्रकाशन सोहळा पार पडला.यावेळी विविध क्षेत्रातील वीस मान्यवरांना सातपुडा जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.मराठी साहित्यातील "भूमिनिष्ठ जाणिवा" या विषयावर श्री ज्ञानेश्वर रक्षक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या परिसंवादामध्ये डॉ.राजेश मिरगे,डॉ.राजेंद्र मुंडे यांनी मराठी साहित्यातील भूमिनिष्ठ जाणिवांचे विविध पैलू विशद करून साहित्यिक व रसिकांचे वैचारिक प्रबोधन केले. दुपारी 2.30 ते 3.30 या वेळेत प्रसिद्ध कवी व गझलकार श्री विष्णू सोळंके यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे अतिशय देखणे व दर्जेदार कविसंमेलन पार पडले या कविसंमेलनाचे प्रमुख अतिथी म्हणून श्री भाऊसाहेब थुटे व आबासाहेब कडू प्रामुख्याने उपस्थित होते.या कविसंमेलनामध्ये गजानन मते,विजय सोसे, नितीन वरणकार, संजय कावरे,रविंद्र जवादे,प्रमोद पंत,प्रशांत ढोले,जयश्री कोटगीरवार, विजय बिंदोड या मान्यवरांनी आपल्या बहारदार कविता सादर करून रसिक साहित्यिकांना चांगलेचं मंत्रमुग्ध केले.यानंतर झालेल्या गझल मुशायऱ्याने तर रसिकांना अगदीचं खिळवून ठेवले.या गझल मुशायऱ्याचे अध्यक्ष प्रसिद्ध गझलकार अनंत नांदूरकर खलिश हे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून सौ.विजया मारोतकर,विनय मिरासे, रजियाताई सुलताना प्रामुख्याने उपस्थित होत्या. त्यानंतर झालेल्या खुल्या कविसंमेलनापर्यंत साहित्यिक व रसिकांची कार्यक्रमाला चांगलीचं उपस्थिती होती. साहित्य संमेलनाच्या समारोपीय सत्रात संवेदना बहुउद्देशीय संस्थेतर्फे अध्यक्ष गजानन काकडे यांचे हस्ते संमेलनात विशेष सेवा देणाऱ्या गुरुकुलातील विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.या भव्य राज्यस्तरीय सातपुडा मराठी साहित्य संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजक,संवेदना बहुद्देशीय संस्था अध्यक्ष गजानन काकडे,उपाध्यक्ष विशाल मोहोड,सचिव सुयोग राजनेकर,सहसचिव सारंग ताथोडे, कोषाध्यक्ष अजय अडीकने,सदस्य खुशाल गुल्हाने,विशाल कन्हेरकर,अंकुश वानखडे व गौरव कांडलकर तसेचं राष्ट्रसंत तुकडोजी महाराज युवक विचारमंच संस्थापक अमर वानखडे,तिवसा तालुका काँग्रेस महासचिव गौरव ढोरे आदी मान्यवरांचे विशेष कौतुक होत आहे.



# अनाड येथे विकासकामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**अजिंठा:** सिल्लोड तालुक्यातील अनाड येथे महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष कृषीमंत्री तथा सिल्लोड-सोयगांव विधानसभा मतदारसंघाचे भाग्यविधाते नामदार अब्दुल सत्तार साहेब यांच्या प्रयत्नातून व विशेष पाठपुराव्यातून विविध विकासकामांचे भूमिपूजन व उदघाटन करण्यांत आले. ग्रामपंचायत कमिटीच्या वतीने नारळ फोडून या विकासकामांचा शुभारंभ करण्यांत आला. यांत तलाठी यांनी मुख्यालयी थांबण्यासाठी तलाठी भवन कार्यालय व निवासस्थान, जलजीवन मिशन अंतर्गत सुधारणात्मक पूर्णजोडणी करणे, अनाड ते तोंडापुर जिल्हा सरहद रस्त्याचे काम करणे, स्मशानभूमीचे बांधकाम व सुशोभीकरण करणे, मातोश्री पानंद योजने अंतर्गत पानंद रस्ते बनविणे आदी विविध विकासकामांचे भूमिपूजन व उदघाटन करण्यांत आले.

यावेळी यांप्रसंगी सरपंच रामकोरबाई बिरारे, उपसरपंच प्रविण जाधव, ग्रा.पं.सदस्य भागवत शिंदे, ग्रा.पं. सदस्य गजानन गदाई, पत्रकार तथा ग्रा.पं.सदस्य संदीप मानकर, माजी सरपंच आत्माराम मुके, विनायक पाचिंगे, सुपडा साखळे, तुकाराम पवार, आण्णा बावस्कर, रतनसिंग पवार, संजय पवार, गोपाल पवार, प्रकाश भिसे, सुरेश बावस्कर, दिपक बावस्कर, राजू शिंदे, नामदेव पवार, संदीप पवार आदींसहित गावकऱ्यांची उपस्थिती होती. यांवेळी गावांत वेगवेगळ्या निधीतून विकासकामे होत असल्याने आणि गांवचा चेहरा-मोहरा बदलुन गांव प्रगतीकडे जात असल्याने ग्रा.पं. सदस्य संदीप मानकर यांनी कृषीमंत्री सत्तार यांचे आभार मानले.

# अशोक राठोड यांना राजे यशवंतराव होळकर आदर्श शिक्षक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :**यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे जय मल्हार सामाजिक प्रतिष्ठान, बीड आयोजीत राजे यशवंतराव होळकर जयंती निमित्त"राजे यशवंत राव होळकर राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार" वितरण सोहळा पार पडला.माजी मंत्री लोकनेते आदरणीय जयदत्त ( आण्णा ) क्षीरसागर साहेब व श्रीमंत भूषणसिंहराजे होळकर ( वंशज होळकर घराणे इंदोर ) मा.प्रा. सर्जेराव काळे डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर साहेब, मा.इंजी विष्णु देवकते डॉ शिवाजी राऊत , प्रतिष्ठान चे अध्यक्ष प्रा राजेंद्र. गाडेकर सर व मान्यवरांच्या हास्ते सरस्वती विद्यालय तेलगाव ता.धारुर चे विद्यार्थी प्रिय व सामाजिक कार्यात सदैव तत्पर असणारे श्री अशोक संपतराव राठोड सर यांना प्रदान करण्यात आला या वेळी प्राचार्य श्री शिंदे व्हि.आर.सर पर्यवेक्षक श्री चवार सर राठोड सरांचा मित्र परिवार , कुटुंबातील सर्व सदस्य व सरस्वती परिवारातील सदस्य उपस्थित होते.



# गंध फुलांचा गेला सांगून, रंग फुलांचा आहे अजून

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात पांगऱ्याची झाडे व पळसाची झाडे लाल रंगाच्या फुलाने बहरुन गेलेली दिसून येत आहेत. याबाबत सविस्तर माहिती अशी की संत श्रेष्ठ तुकाराम महाराज आपल्या अभंगातून झाडा बद्दल अशी सुंदर वर्णन केलेले आहेत आणी ते म्हणतात की वृक्ष हे दुसरे तीसरे कुणी नाही तर आपले सगे सोयरे आहेत. वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे अशा गोड अभंग मध्ये त्यांनी मानवाला वृक्षावरती प्रेम करायचे सांगितले आहे. परंतु त्या अभंगाच्या शब्दाकडे लक्ष ना देता अलीकडे फळ फळावर देणारी मोठमोठी झाडे तोडली जात आहे. आंबा, रामफळ, सिताफळ, चिकू ,कावीट, टेबरीचे झाड, सागाचे झाड, लिंबाचे झाड, बाभळीचे झाड, चिंचेचे झाड, जांभळी चे झाड, या झाडापासून आपणास गोड गोड फळे चाखावयास मिळतात तर काही झाडापासून संसार उपयोगी फर्निचर व घरातील विविध प्रकारच्या वस्तू बनवून मिळतात तरी सांगायचे ठरवले तर या पलीकडे देखील सफरचंद ,डाळिंब, चिकू, मोसंबी,संत्र,केळी, ही गोड फळे चाखाव्यास मिळते. हिवाळा, पावसाळा, उन्हाळा, असे तीन ऋतू येतात काही ऋतूमध्ये वृक्षाची पानझड होते. तर चैत्र महिन्यात मात्र वृक्षांना नव नवीन पालवी येते त्यामुळे सर्व झाडे नव्या नवरी नगरीप्रमाणे हिरवा शालू नेसल्यागत दिसून येतात पळसाची झाड आणि पांगराची झाड यांनी तर आपला रंग अजूनही जिवंत ठेवलेला दिसतो. सध्या तरीअनेक प्रकारचे केमिकल टाकून अनेक कलर तयार करून संध्या बाजारात विविध प्रकारचे रंग तयार केले जातात. त्याची विक्री केले जाते व धुलीवंदनाला रंगाची नाचत गात त्याची उधळण केले जाते. परंतु काही रंगामुळे शरीराला अपायकारक सुद्धा ठरतात परंतु निसर्गाने होळी व धुलीवंदनाच्या मोसमा मध्ये हजारो वर्षापासून जिवंत आहे . ही परंपरा अजूनही सावळदबारा ग्रामीण भागामध्ये जोपासली जाते आहे.

पळसाच्या झाडाची लाल फुले व पांगराच्या झाडाची लाल फुले आजही बच्चे कंपनी राणा वनातून तोडून आणून ती फुले वाळू घालतात पाण्यामध्ये भिजवून व गोळा करून त्याचा चुरा केला जातो. त्यातून निघालेला लाल रंग पिचकारी यामध्ये भरून रंगपंचमी आजही सोयगाव तालुक्यात ग्रामीण भागामध्ये अति उत्साहात साजरी केली जाते. परंतु अलीकडे बेकायदा व अवैधरित्या होत असलेल्या वृक्षतोडीमुळे ही झाडे दुर्मिळ झाल्यामुळे कमी प्रमाणात दिसून येतात.



अलीकडे शासन झाडे लावा झाडे जगवा वृक्षतोड बंद करा कुऱ्हाड बंदी करा असा संदेश देत असतानाही मात्र ग्रामीण भागात संबंधित विभागाच्या बेजबाबदार व हलगर्जीपणामुळे अमाप अशी वृक्षतोड चालू असताना दिसून येते . तेव्हा याकडे संबंधित जबाबदार अधिकाऱ्याने लक्ष द्यावे अशी मागणी देखील वृक्ष प्रेमी करतांना दिसतात . वटसावीत्री पौर्णिमेला माता भगिनी आज ही वटवृक्षाच्या झाडाला जन्मो जन्मी हाच पती मिळावा यासाठी वटसावित्री पौर्णिमेला पुजा करुन प्रदक्षिणा घालून उपवास करतात . श्रावण महिन्यात तर बेलांच्या पानांचे महत्त्व तर सर्व माता भगिनींना ज्ञात आहे . श्रावण महिन्यात दैनंदिन उपासना करतांना महादेवाच्या मंदिरात जाऊन बेल वाहुन भक्ती भावाने दर्शन घेऊन भावी भक्त मन प्रसन्न करतात तेव्हा अनेक झाडा मागे काही तरी महत्व आहे हे विसरून चालणार नाही .

**प्रा .जीवन कोलते पाटील सामाजिक कार्यकर्ते सावळदबारा, ता . सोयगाव**

# महासंघ चषक क्रिकेट स्पर्धा 2023 चा चषक जामनेर क्रिकेटसंघाने जिंकला

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जळगाव येथील 25 व 26 फेब्रुवारी 2023 वेळ सकाळी 9.00 ते सायंकाळी 5.00 या वेळेत *एकलव्य क्रीडा संकुल, एम जे कॉलेज परिसर जळगाव येथे महाराष्ट्र राज्य मान्य खाजगी प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर महासंघ जिल्हा जळगाव यांनी संपूर्ण जळगाव जिल्हा करिता आयोजित केलेला होता. यात जळगाव जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याने सहभाग नोंदविला .जामनेर तालुका महासंघ, क्रिकेट संघाचे प्रायोजक व मार्गदर्शक श्रीमती सरला ताई पाटील तर संघाचे कॅप्टन श्री दिनेश महाजन सर नूतन प्राथमिक शाळा जामनेर यांनी काम पाहिले. जामनेर तालुका क्रिकेट संघाने सुरुवातीपासूनच रोमहर्षक विजय मिळवून अगदी अंतिम सामन्यापर्यंत विजयरथ सुरूच ठेवला. चाळीसगाव ,रावेर, जळगाव व अंतिम सामना पाचोरा तालुक्या विरुद्ध जिंकून जामनेर तालुक्याने चषक व रोख रु.3000/- चे पारितोषिक जिंकलेले आहे. आशपाक शेख सर उर्दू शाळा शेंदुर्णी यांना मॅन ऑफ द सिरीज तर उत्कृष्ट गोलंदाज श्री सुनील चौधरी ललवाणी प्राथमिक शाळा जामनेर पुरा, यांना मिळाला. जामनेर तालुका क्रिकेट महासंघाने चांगली कामगिरी करून जिल्हा चषक जिंकल्याबद्दल क्रिकेट टीम मधील प्रत्येक सदस्यांचे, कॅप्टन श्री दिनेश महाजन सर नूतन प्राथमिक शाळा जामनेर , प्रायोजक व मार्गदर्शक श्रीमती सरलाताई पाटील यांचे अभिनंदन जिल्हा सदस्य - श्री. देवीदास काळे , तालुका अध्यक्ष - श्री राजेंद्र पाटील व तालुका सचिव - श्री मोहन पाटील तसेच तालुक्यातील प्रत्येक शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी केलेले आहेत व तालुक्यातून आनंद उत्सव साजरा केला जात आहे.



# साठवून ठेवलेल्या पांढऱ्या सोन्याला भाव मिळेना

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात यावर्षी कापसाला चांगला भाव मिळेल या आशेवर सावळदबारा परिसरातील बहुतांश शेतकऱ्यांनी फेब्रुवारी महिना संपलावर देखील कापूस विकला नसल्याने घरात साठवून ठेवलेल्या कापसामध्ये किडे तयार होत असून, या पिसामुळे शेतकऱ्यांच्या घरातील सदस्यांच्या अंगाला खाज सुटण्याचे प्रमाण वाढले आहे. ग्रामीण भागात या रुग्णांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर नवीन संकट उभे राहिले आहे. कापसाला जास्त भाव मिळत नसल्यामुळे विकता देखील येत नाही. तर दुसरीकडे त्यांच्यातील पिसामुळे अंगाला सुटणाऱ्या खाजमुळे कापूस घरात ठेवायलाही आता शेतकरी तयार नसल्याने शेतकरी दुहेरी अडचणीत सापडले आहेत. खाजऱ्याच्या समस्येमुळे शेतकरीही कंटाळले असून अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी या त्रासामुळे कापूस विक्री करण्यास सुरुवात केली आहे. काही शेतकरी घरात कापूस असल्याने रात्रीच्या वेळेस थंडीतही घराबाहेर झोपणे पसंत करत आहेत. अनेक संकटांचा सामना करून पांढरं सोनं शेतकऱ्यांनी पिकविले. परंतु, माल हाती येताच बाजारातील दर उतरले. परिणामी आता कापूस घरात ठेवावा तर त्याला पिसर्व लागतायत अन् बाजारपेठेत भाव मिळत नाही, अशा द्विधा मनःस्थितीत तालुक्यातील कापूस उत्पादक अडकला आहे. अनेकांच्या नजरा आता दरवाढीकडे लागल्या आहेत.



प्रारंभी कापसाला ११ हजार रुपयांचा भाव मिळाला . मात्र ११ हजारांवरून हे दर सात हजार ५०० पर्यंत आले आहेत . दरवाढीच्या आशेवर शेतकऱ्यांनी कापूस घरात साठवून ठेवला आहे . मात्र दिवसेंदिवस कापसाचे भाव कमी होत आहेत . अपेक्षेप्रमाणे कापसाला भाव मिळत नसल्याने कापसाच्या गंजी प्रत्येक घरात पाहायला मिळत आहेत . या कापसाच्या गंजीला आता पिसवा लागल्या आहेत . त्यामुळे त्या चावा घेतल्यानंतर अंगाला खाज सुटते . त्यामुळे कापसाच्या गंजीजवळ जाऊन पाहणे सुद्धा शेतकऱ्यांना धोकादायक झाले आहे . **शेतकरी दारासिंग बंडू चव्हाण ( माजी सरपंच )नादांतांडा ता सोयगाव**



# स्वेरीत 'रंगसंवाद-२०२३' या स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूरच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीमध्ये रविवार, दि.२९ जानेवारी २०२३ रोजी छोट्या गटापासून ते पदव्युत्तर पदवी मधील विद्यार्थ्यांसाठी एकूण ६ गटांमध्ये सकाळी ९ ते दुपारी १२ वाजेपर्यंत 'रंगसंवाद-२०२३' या चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे औचित्य साधून या स्पर्धेचा निकाल चित्रकलेतील अनुभवी चित्रकारांकडून परीक्षण करून काढण्यात आले. या स्पर्धेच्या सर्व गटांतील विजेत्यांना शिवजयंतीच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे बारामतीच्या विद्या प्रतिष्ठानचे प्रा. डॉ.राजकुमार कदम व उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्रे व रोख पारीतोषिके देण्यात आली. स्वेरीमध्ये आयोजिलेल्या 'रंगसंवाद-२०२३' या चित्रकला स्पर्धेत पंढरपूर व तालुक्यातील जवळपास सर्व शाळा, महाविद्यालयांमधून ६ गटात एकूण ११६८ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेचे समन्वयक प्रा.यशपाल खेडकर यांनी 'रंगसंवाद-२०२३' स्पर्धेची सविस्तर माहिती दिली. या स्पर्धेच्या प्रत्येक गटातून तीन क्रमांक काढण्यात आले असून प्रत्येक गटातून स्वतंत्र बक्षिसेही वितरीत करण्यात आली. प्रथम क्रमांकासाठी रोख रु. दिड हजार, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकासाठी रोख रु.एक हजार, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र, तृतीय क्रमांकासाठी रोख रु. पाचशे, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र तर उत्तेजनार्थ दोन स्पर्धकांना स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले. यावेळी कोर्टीच्या नूतन हायस्कूलचे मुख्याध्यापक प्रसाद संत, स्वेरीचे माजी अध्यक्ष व विश्वस्त धनंजय सालविठ्ठल, विश्वस्त बी.डी.रोंगे, युवा विश्वस्त प्रा. सुरज रोंगे, कॅम्पसचे इन्चार्ज, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ.एन. डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतीश मांडवे, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग, इंजिनिअरिंग व फार्मसीचे स्टुडंट कौन्सिलचे सचिव, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

# मित्रासाठी अभिजीत पाटलांची पराकाष्ठा



आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांचे जळोली गावचे सहकारी मित्र व विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक दत्तात्रय नरसाळे यांना मागील चार पाच दिवसापासून पोटदुखीचा त्रास होत असल्यामुळे सोलापूर येथील आश्विनी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. आज त्यांना मुंबई येथील ग्लोबल हॉस्पिटल येथे उपचारांसाठी विमान ॲम्बुलन्सने हालवण्यात आले आहे. नरसाळे यांना चार पाच दिवसापासून पोटदुखी चा त्रास जाणवत होता. पंढरपुर येथील बोरावके हॉस्पिटलमध्ये 2 दिवस उपचार घेतल्यानंतर त्यांना सोलापूर येथील आश्विनी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. पोटदुखी आजारामुळे काही शस्त्रक्रियेनंतर त्यांची तब्येत खालावली होती. पोटात आतड्यात इन्फेक्शन जास्त असल्यामुळे ऑपरेशन केले होते.

गेली दोन दिवस अभिजीत पाटील हे मुंबई येथे ठाण मांडून असताना मोठमोठ्या हॉस्पिटलमध्ये अनेक डॉक्टरांचे सल्ले घेत होते डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांनी सोलापूर अश्विनी हॉस्पिटल येथून आज दुपारी ४वा ॲम्बुलन्स विमानाने आपल्या मित्राला स्वतः अभिजीत पाटील हे येऊन आपल्या मित्राला मुंबई येथे दाखल केले.

पोटातील आतड्याच्या ऑपरेशनमुळे ट्रेसप्लान्ट करणे गरजेचे होते त्यासाठी अभिजित पाटील यांनी हैद्राबाद, मुंबई, पुणे याठिकाणी चौकशी सुरू असताना मुंबई येथील ग्लोबल हॉस्पिटल येथे दाखल करण्यासाठी आज अभिजित पाटील यांनी एअर अबुलन्स चो सोय करून स्वतः अभिजित पाटील हे मित्रांला सोलापूर येथून दत्तात्रय नरसाळे यांना उपचारासाठी एअरलिफ्ट ॲम्बुलन्स केले.

**मित्रासाठी धावले अभिजित पाटील :** सोबत काम करणारा सहकारी त्याच्यावर आज संकट असताना मी एकटा सोडणं योग्य नाही त्यांना लवकरात लवकर उपचार सुरू करणे आणि लवकर आजारातून मुक्त करणे माझी जबाबदारी आहे . काल मुंबई येथील विविध हॉस्पिटल आणि डॉक्टर्स सोबत चर्चा करून चांगल्या सुख सुविधा व अधिक टेक्नॉलॉजीमुळे मुंबई येथे ग्लोबल हॉस्पिटल येथे हलवण्यात आले आहे . मी स्वत : त्यांच्या सोबत आहे एअर ॲम्बुलन्स घेऊन सोलापुरातून मुंबईला हॉस्पिटल येथे उपचार सुरू केले आहेत . लवकर आजारातून होऊन बरे होतील .




# कॉपीमुक्त परीक्षेला सामोरे जा

## स्वाती लहाणे : निबार्क शाळेत विद्यार्थ्यांना निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** शहरातील निंबार्क इग्लीश स्कुलच्या इयत्ता १० च्या विद्यार्थ्यांना मंगळवारी निरोप देण्यात आला या प्रसंगी पोलीस उपनिरीक्षक स्वाती लहाणे यांनी दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सध्याच्या परिक्षाचा आढावा घेत कॉपी मुक्त परिक्षेला सामोरे जा तरच तुमचे ध्येय पुर्ण होईल दहावीची परिक्षा म्हणजे तुमची पहीली पायरी त्यामुळे कॉपी करुच नका असा सकंल्प करा म्हणून शुभेच्छा दिल्या. जीवनात प्रत्येकाला समाज वाचता आला तर तुम्ही जीवनात यशस्वी झाल्याशिवाय रहाणार नाही. अभ्यासक्रमाची चौकट निश्चित आहे कोणते प्रश्न येतील याचा विचार करून परीक्षा फार कठीण आहे हा गैरसमज मनातून काढून टाका. तुमच्या शाळेमध्ये जे काही सराव पेपर होतात प्रॅक्टिस टेस्ट होतात ह्या सर्वात महत्त्वाच्या परीक्षा असतात.असे मत संस्थेचे अध्यक्ष प्रविण मोरे यांनी निंबार्क इग्लीश स्कुलच्या दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभाच्या निमित्ताने केले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सुनील गायकवाड , समाजसेवक राम आहुजा, सचिन जोतिक, सचिन कावसानकर, पत्रकार सुरेश वायभट, मोरे क्लासेसचे संचालक नितीन मोरे, मॅनेजर विजय भिंगारे, मुख्याध्यापक त्रंबक बटुळे, कृष्णा जाधव, साधना मोरे, रामनाम जवरे, प्रतिभा जोतिक, पुजा औटे, अमोल मोरे यांची उपस्थिती होती.

दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून शिक्षकां बद्दल आदर व्यक्त केला.यावेळी शिक्षिका साधना मोरे यांनी विद्यार्थ्यांना दहावीच वर्ष आयुष्याला कलाटणी देणार वर्ष आहे.त्यामुळे ध्येय निश्चित करून अभ्यास करावा व त्या दिशेने मार्गक्रमण करत जावे. आई वडिल यांचा आदर करावा.अभ्यास कसा करावा, संगणक प्रशिक्षण आवश्यक आहे तसेच मोबाईल वापर टाळावा.बाहेरील जग तुमची वाट पाहत आहे पण पुढे खूप स्पर्धा आहे. त्यामुळे मार्क जास्तीत जास्त मिळवले पाहिजे असा मंत्र दिला.

# तीन लाखांच्या मोटारसायकल जप्त

## पाच पोलीस ठाण्यातील गुन्हे उघडकीस; चोरटा अटकेत

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** एन १२ हडको परिसरात रेकॉर्डवरच्या गुन्हेगाराला चोरीच्या मोटारसायकल विकताना गुन्हे शाखेने ९ मोटारसायकलसहित अटक केली आहे. २ लाख ९० हजार रु. च्या मोटारसायकल असल्याचे पोलिसांनी सांगितले.



शिवाजी भिकन चव्हाण (५०) रा. हिमायतबाग परिसर असे अटक आरोपीचे नाव आहे.तो सायन्स ग्रॅज्युएट आहे नोकरी न मिळाल्यामुळे या धंद्याकडे वळलो अशी कबुली त्याने गुन्हे शाखेला दिली त्याने सातारा, छावणी, बेगमपुरा, सिडको, सिडको औद्योगिक परिसर, वाळूज औद्योगिक परिसर, सिटीचौक, क्रांतिचौक या भागातून गेल्या वर्षभरात या मोटरसायकल चोरल्याची कबुली गुन्हेशाखेला दिली गुन्हेशाखेने पुढील तपासासाठी आरोपीला सिडको औद्योगिक पोलिसांच्या हवाली केले आहे शिवाजी हा विवाहित असून त्याला दोन मुले आहेत त्यांची शिक्षण आणि संसार चालवण्याकरता आपल्याला हा मार्ग निवडावा लागला असेही त्याने पोलिसांना सांगितले. वरील कारवाई पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय कल्याण शेळके, पोलीस कर्मचारी राजेंद्र साळुंके, शेख हबीब, विजय निकम, संजय मुळे यांनी पार पाडली.

# एकाच कुटुंबात दुसऱ्यांदा घरकुलाचे वाटप; सुनील माकोडे यांचा प्रशासनावर आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यामधे राजकीय नेते- पुढारी यांच्या हुकुमशाहीने खऱ्या नवं गरजू लाभार्थ्यांना डावलून शासकीय घरकुल योजनेपासून वंचित राहावे लागत आहे. घरकुलचा लाभ धनदांडग्यांना आणि त्यांच्या नातेवाईकांना दोन-दोन वेळा दिला जात असल्याची तक्रार राष्ट्री कॉंग्रेस अनुसूचीत जाती विभाग सोयगाव तालुका अध्यक्ष सुनिल नारायण माकोडे यांनी गटविकास अधिकारी पंचायत समीती सोयगाव यांच्याकडे केली आहे. दरम्यान, रमाई आवास योजनेच्या घरकुल योजनेच्या यादीत पुढा यांच्या दबावाखाली एका एका कुटुंबामधे दोन- दोन वेळा पुन्हा त्याच लाभधारकाला आणि नातेवाईकांना घरकुल दिले जात आहे. त्यामुळे अनेक गोरगरीब गरजु लाभार्थ्यां या योजनेपासून वंचित राहत आहे.याप्रकरणी राष्ट्रीय कॉंग्रेस अनुसूचीत जाती विभाग सोयगाव तालुका अध्यक्ष सुनिल नारायण माकोडे यांनी चौकशी करण्यासाठी गटविकास अधीकारी पंचायत समिती सोयगाव यांच्याकडे तक्रार दिलेली आहे. वर्ष २००० ते २०२२ पर्यंत ज्या ज्या लाभधारकांना घरकुल दिलेले आहे त्यांची यादी मागीतलेली आहे. दरम्यान संबंधित विभागअर्ज करुन ही माहिती उपलब्ध करीत नसल्याने केंद्रीय माहिती अधिकार २००५ अंतर्गत माहिती मागवण्यात आलेली आहे. माहिती व प्रकरण दाबण्याचा प्रयत्न होत आहे काही राजकीय पक्षाचे नेते स्वतः घरकुलाचा लाभ घेऊन स्वाताच्या नातेवाईकांना लाभ देत आहे. राजकारण्यांची सुरू असलेली मनमाणी व हुकुमशाही थांबवण्यात यावी खऱ्या गरजू गोरगरीबांना शासकीय घरकुल योजनेचा लाभ देण्यात येण्याची मागणी सुनिल माकोडे यांनी केली आहे.

# 'वेणूगंधर्व संगीत महोत्सवाचे' आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

पुणे : अमूल्य ज्योती आणि केशव वेणू प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसिद्ध बासरीवादक आणि केशववेणूचे संशोधक, निर्माते डॉ. पं. केशव गिंडे यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्त 'वेणूगंधर्व संगीत महोत्सवाचे' आयोजन येत्या शनिवार दि. ४ आणि रविवार दि. ५ मार्च रोजी करण्यात आले आहे.

कर्वेनगर येथील कर्नाटक हायस्कूलच्या सभागृहात हा सोहळा होणार असून सोहळ्याचे हे ३५ वे वर्ष आहे. रविवार ५ मार्च रोजी सायंकाळी सहस्त्रचंद्रदर्शन संगीत सोहोळ्यात पं. गिंडे यांच्या सांगितिक कार्यावर आधारित 'नादब्रह्म' या चित्रफीतीचे उद्घाटन करवीरपीठाचे शंकराचार्य विद्यानृसिंह भारती स्वामी यांच्या हस्ते होणार असून 'वेणू गंधर्व' या पुस्तकाचे प्रकाशन मूर्तीशास्त्राचे गाढे अभ्यासक डॉ..गो.ब.देगलूरकर यांच्या हस्ते होणार आहे. पंडित गिंडे यांचे शिष्य, बासरीवादक शशिकांत चिंचोरे यांनी या ग्रंथाची निर्मिती केली आहे. याच ग्रंथांनी पंडित गिंडे यांची ग्रंथतुला यावेळी करण्यात येणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या वेणूगंधर्व संगीत महोत्सवात एकूण तीन सांगीतिक सत्रे होणार आहेत. शनिवारी प्रथम सत्रात सायं. ५ वाजता बासरीवादक दिपक भानुसे, गायक पं. सुधाकर चव्हाण, बासरी वादक पं. नित्यानंद हळदीपूर, गायक पं. उदय भवाळकर यांचा कार्यक्रम होणार आहे. तर रविवारी ५ रोजी सकाळी ९. ३० वाजता डॉ. पं. केशव गिंडे आणि शिष्य 'कल्याण नवरंग सागर' हा कार्यक्रम सादर करतील. तसेच विदुषी मंजिरी आलेगावकर, बासरीवादक पं. राजेंद्र कुलकर्णी व्हायोलिनवादक पं. अतुलकुमार उपाध्ये यांची सांगीतिक जुगलबंदी यावेळी रसिकांना अनुभवायला मिळणार आहे. तसेच दुपारी ४ वाजता तिसऱ्या सत्रात 'अमर बन्सी' हा प्रसिद्ध बासरी वादक अमर ओक यांचा कार्यक्रम होणार आहे. यावेळी गायक पं. प्रसाद खापर्डे यांचे गायन होणार आहे.

# धुळे शहरात समस्या सुटत नसल्याने नागरिकांना वैताग

## पाणी टंचाई व इतर समस्या सुटेनात! सत्ताधारी पद मोहाच्या बाजारात व्यस्त..!

आधुनिक केसरी

**उन्हाळा सुरु होण्या आधीच शहराच्या काही भागात 8 ते 10 दिवस पाणी पुरवठाच होत नाही. त्या मुळे स्थानिक नागरिकांना अति त्रास सहन करावा लागतोय विशेष म्हणजे, शहराचा पाणी पुरवठा अवलंबून असणारे प्रकल्प ओसंडून वाहत असतानाही केवळ पालिकेच्या विस्कळीत नियोजनाचा फटका धुळेकरांना अनेक दिवसांपासून सहन करावा लागत आहे. हा विषय अनेक वेळा मांडून सत्ताधारी नगरसेवकही वैतागले आहेत. मनपामध्ये एकूण ७४ पैकी ५० सदस्य एकट्या भाजपचे आहेत. असे असताना त्यांच्या प्रशासनावर वचक नाही. फक्त जातीपाती चे राजकारण करून विकास कामांना भर्मित करण्याचे काम धुळेकर जनतेला केले जात आहे.**

सत्ताधारी फक्त त्यांच्या नगर सेवक, महापौर,स्थायी असे पद भार देण्यासाठी व्यस्त आहे "अपना काम बनता भाड मे जाये जनता" अशी गम्मत सत्ताधार्यांची आहे. स्वतः एवढे वर्ष सत्तेत असून यांच्या कडुन नागरिकांचे प्रश्न सुटेना आणि आमदाराच्या विकास कामात अडथळा मात्र नक्की ! महापालिकेत एकहाती सत्ता असे असतानाही मनपातील सत्ताधाऱ्यांवर प्रशासन भारी पडत असल्याने नगरसेवकांना महासभा असो



आकाश सोनवणे
संपर्क क्र. 8806881269

किंवा स्थायी समितीची सभा असो, सत्ताधारी भाजपलाच घरचा आहेर देण्याची वेळ वारंवार येत आहे. शहरातील रस्त्यांची झालेली दुरावस्था, मोकाट कुत्रे, विस्कळीत झालेला पाणी पुरवठा या समस्या सत्ताधारी भाजपसाठी डोकेदुखी ठरु लागल्या आहेत. कुठल्याही समस्येवर ठोस उपाययोजना होत नसल्याने भाजपच्या नगरसेवकांना आयुक्तांसह इतर अधिकाऱ्यांविरुध्द ओरड करण्याशिवाय पर्यायच नसल्याचे वारंवार दिसून येत आहे. महापालिकेत एकहाती सत्ता असलेल्या पक्षाकडून जनतेच्या अपेक्षा अधिकच वाढलेल्या असतात. त्यातच निवडणूक प्रचारावेळी दिलेल्या आश्वासनांपैकी एकही आश्वासन पूर्णत्वाकडे जात नसल्याचे दिसून आल्यावर जनतेचा असंतोष वेगवेगळ्या प्रकारच्या आंदोलनांमधून व्यक्त होण्यास सुरुवात होतो. त्याची सर्वाधिक झळ त्या प्रभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या नगरसेवकांना बसते. त्यातही तो सत्ताधारी पक्षाचा असेल तर त्यास अधिकच. हाच अनुभव धुळ्यात भाजपचे नगरसेवक घेत आहेत. महापालिकेत विरोधी पक्षाचे अस्तित्व नाममात्र असताना महासभा, स्थायी समिती सभांमध्ये त्यांच्याकडून सत्ताधाऱ्यांना फारसा विरोध होण्याची शक्यता नसते. परंतु, विरोधकांची उणीव भासणार नाही, याची पुरेपूर दक्षता सत्ताधारी नगरसेवकांकडून घेतली जात आहे. समस्या सुटत नसल्याने आपणास नागरिकांच्या रोषास कशा प्रकारे सामोरे जावे लागत आहे, याचे कथन अनेक सत्ताधारी नगरसेवकांकडून करून झाले आहे. विशेष म्हणजे त्यापैकी अनेक समस्या त्याच त्या स्वरुपाच्या आहेत. महापालिका निवडणूक प्रचारावेळी जाहीरनाम्यांमधून विविध विकास कामांचे वचन देणाऱ्या भाजपला आपल्याच जाहीरनाम्याचा जणू विसर पडला आहे. शहरवासीयांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत प्रशासकीय विभागांकडून अनेकवेळा होत असलेली दिरंगाई आणि उदासीनताही अखेर सत्ताधारी भाजपवर टीका होण्यास कारणीभूत ठरत आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत आणि अगदी स्थायी समितीच्या बैठकीतही सदस्यांनी आपल्याच पक्षाला घरचा अहेर देत शहरातील समस्यांचा पाढा वाचल्याची शेकडो उदाहरणे आहेत. मोकाट कुत्री आणि त्यांच्यामुळे ठिकठिकाणी जखमी होणाऱ्या नागरिकांविषयीची प्रकरणे सदस्यांनी अनेक वेळा मांडली आहेत.



# डिकसळमध्ये मराठी भाषा गौरव दिन

आधुनिक केसरी न्यूज

**रवींद्र कांबळे**

**सांगोला :** तालुक्यातील डिकसळ गावातील राजकिय, शैक्षणिक, शेती, व्यावसायिक क्षेत्रामध्ये स्वकतृत्वाने स्वतःच्या गावचे नाव उज्वल करण्यार्या सत्कार मुर्तीचा सत्कार वाचनालयास मराठी भाषा गौरव दिन व कवि शिरवाडकर. यांच्या जयंतीचे अवचित साधून संपन्न झाला कवी शिरवाडकर यांच्या प्रथमेश चे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष शशिकला बाबर मॅडम, वाचनालयाचे अध्यक्ष बाळासाहेब भुसनर सर, सर्व मान्यवरांच्या हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संतोष करांडे यांनी म्हणाले की त्या सर्व सत्कारमूर्ती अत्यंत प्रतिकुल परस्थितीतून यशाच्या शिखरापर्यंत पोहचल्या आहेत. श्री तुकाराम भुसनर सर यांनी सांगोला तालुका खरेदी विक्री संघाच्या उपाध्यक्ष पदी निवड झालेली आहे तर राजेंद्र कांचन कोटी संघटना आदर्श शिक्षक पुरस्कार CBS न्यूज तर्फे देण्यात आलेला आहे. आदर्श प्रगतशील बागायतदार शेतकरी पुरस्कार श्री सोपान कृष्णा करांडे यांना मिळालेला आहे. डिसकळ गावचे पोलिस पाटील अनिल कुलकर्णी यांची मुलगी आसावरी अत्यंत परिश्रमातुन इंजिनियर होऊन चांगला जॉब मिळवला आहे.धनराज करताडे, यांची मुलगी सुवर्णा MSC पूर्ण करत आहे.अनिल बळवंत कुलकर्णी यांची ही मुलगी पल्लवी इंजिनिअर होऊन चांगला जॉब मिळवला आहे अशा सर्वांचा सत्कार व अभिनंदन करण्यात आले.

श्रीपाद कुलकर्णी सरांनी मराठी भाषेचे महत्व पटवून दिले. कवी वि.वा शिरवाडकर यांच्या कार्याचा विशेष गौरव करण्यात आला काही कविताही ऐकविण्यात आल्या क वि व्हायचेय तुकाराम भुसनर सर यांनी मनोगत व्यक्त केले. म. फुले आंबेडकर सार्वजनिक वाचनालय डईसकळ अध्यक्ष बाळू भुसनर सर उपाध्यक्ष संतोष करांडे माजी चेअरमन बाबासाहेब कोरे, पोलीस पाटील अनिल कुलकर्णी, श्रीमंत निळे, अमृत निळे, पिराजी वाघमोडे, विश्वास यादव, शशिकला बाबर मॅडम, अपूर्णा कुलकर्णी अवदुत कुळकर्णी, दयानंद करताडे यांचे सह अनेर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अनिल गेजगे,संजय गेजगे यांनी खूप परिश्रम घेतले.

# अवैधरित्या प्लॉटिंग करण्यास विरोध केल्यामुळे जीवे मारण्याची धमकी

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद शहरात :** भू - माफियाची टोळी सक्रिय असून अडी - अडचणीत असलेल्या किंवा कौटुंबिकवाद असलेल्या लोकांशी संपर्क करून व महसूल प्रशासनाला हाताशी धरून आपले भूखंडातून श्रीखंड लाटत आहेत.असाच काहीसा प्रकार बाळापूरमध्ये घडला आहे.बाळापूरमधील शेख रऊफ यांच्या मालकीची गट क्रमांक ४४५ व ४४७ मध्ये अनुक्रमे ०.हेक्टर २५ आर जमीन आहे. रऊफ यांच्या जमिनी लगत त्यांचे काका शेख खाजेमियाँ यांचीही जमीन होती. मात्र त्यांनी ही जमीन भूखंड व्यवहारातील वादग्रस्त व्यक्तिमत्व अब्दुल राफे यांना विकली आहे. राफे व खाजेमियाँ यांनी ह्या जमिनीवर अवैधरित्या, मोजमाप न करताच शेख रऊफ यांच्या क्षेत्रात अतिक्रमण करून फ्लॉटिंग करून विक्री करण्याचा घाट घातला आहे.असा आरोप राऊफ यांनी केला आहे. याला शेख रऊफ यांनी विरोध केला असता शेख अर्शद, शेख लतीफ,शेख अहमद व अब्दुल राफे यांनी संगनमत करून त्यास जीवे मारण्याची धमकी दिली आहे. यामुळे भयभयीत होऊन शेख रऊफ यांनी तात्काळ याविरोधात तहसीलदारांकडे तक्रार केली आहे. जो पर्यंत जमिनीची मोजमाप होत नाही, जाण्या - येण्यासाठी रस्ता सोडला जात नाही तो पर्यंत या जमिनीवर फ्लॉटिंग करून खरेदी - विक्रीची परवानगी देऊ नये अशी विनंती अर्जाच्या माध्यमातून केली आहे. खरे तर शेख रऊफ यांचे प्रकरण नमुना दाखल असले तरी शहरातील भू माफिया टोळीमुळे शांतता - कायदा व सुव्यवस्था भंग पावण्याची शक्यता आहे. पोलीस प्रशासन व महसूल प्रशासनाने यात लक्ष घालून यावर आळा घालवा अशी मागणी जनतेतून होत आहे.

# सह्याद्री फार्मसीमध्ये मराठी भाषा गौरव दिन

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** कवी वि. वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. या कार्यक्रमात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या उपस्थितीत कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात झाली.

प्रा.हरी जवंजाळ यांनी आपल्या मनोगतात मराठी भाषा गौरव दिन व मराठी भाषेचे महत्व विशद केले. या कार्यक्रमाची प्रस्थावना व सुत्रसंचलन प्रा.पी.एम.आडत यांनी केले.





# कै.अमोल पिसे इंग्लिश मीडियम स्कूलच्या चिमुकल्यांनी भरविला आठवडी बाजार

आधुनिक केसरी न्यूज

**माळशिरस :** तालुक्यातील पिलीव येथील श्रीमती किसाबाई शंकर सरगर बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचलित कै.अमोल पिसे इंग्लिश मिडीयम स्कुल या शाळेमध्ये काल सोमवार दिनांक 27 फेब्रुवारी रोजी आठवडी बाजार या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सागर सरगर यांनी केले होते. शालेय शिक्षण घेत असताना प्रत्यक्ष अनुभवातून व कृतीतून विद्यार्थ्यांना उपयुक्त शिक्षण मिळावे व खर्या कमाईचे व नफा-तोटा याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे हा या उपक्रमाचा हेतू असल्याचे सरगर यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

**ओSSS मामा**
**या इकडं...इंकडं इंकडं**
**भाजी घ्या भाजी!**
**ताजी ताजी भाजी.!**
**10 रुपयला एक**

सेंद्रिय खत वापरुन पिकवलेली केळी खावा अन् आजाराला ठेवा दूर

ओ मामाओ ताईया इकडं अशा चिमुकल्यांच्या आवाजाने शाळेचा परिसर दुमदुमून गेला होता. याचबरोबर लाडू-चिवडा स्टॉल, चहा स्टॉल,गरमागरम गुलगुले, बटाटा चिप्स यांसह अनेक पदार्थ व वेगवेगळ्या प्रकारचा भाजी-पाला विद्यार्थ्यांनी बाजारात विक्रीसाठी आणला होता. बाजारात खरेदी करण्यासाठी पिलीवसह परिसरातील पालकांनी खूप गर्दी केली होती. या प्रसंगी लघु पाटबंधार्याचे सेवा निवृत्त अधिकारी जगन्नाथ जाधव, मुसाखान पठाण, निसार पठाण,बचेरी ग्रा.पं सदस्य विश्वजीत गोरड, सुनिल मदने, अजय वगरे, लक्ष्मण माळी यांसह इतर पालक वर्ग, शिक्षक वर्ग व कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विक्रीसाठी आणलेल्या मालाची 100% विक्री झाल्याने चिमुकल्यांचा आनंद द्विगणित झाल्याचे पहावयास मिळाले तर सागर सरगर यांनी या बाजाराचे आयोजन केल्याने त्यांचेही पालक वर्गातून कौतुक होत असल्याचे पहावयास मिळाले.

# मुखेड येथे रब्बी ज्वारी पीक प्रात्यक्षिक पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मुखेड येथे कृषी विभागाच्या वतीने दि.28 रोजी रब्बी ज्वारी पिक प्रात्यक्षिक पाहणी कार्यक्रम घेण्यात आला यात फुले रेवती या वाणाची पाहणी करण्यात आली. ज्वारी ह्या पिकाचे पारंपरिक पद्धतीने पिकाचे नियोजन केले जात असल्यामुळे जमिनीच्या प्रकारानुसार सुधारित वाण न पेरणे, पेरणीपूर्व व नंतरचे व्यवस्थापन, कीडनियंत्रण, खतांचा अत्यल्प वापर अशा बाबींमुळे ज्वारी धान्य व कडबा उत्पादनात अनियमितता विशेषतः घट येत असते.

जिरायती क्षेत्रावर जास्त उत्पादन येण्यासाठी जमिनीच्या प्रकारानुसार योग्य वाणांची कृषि विद्यापीठ व कृषि विभागाच्या शिफारशीनुसार निवड करावी. फुले रेवती हे रब्बी हंगामासाठी योग्य वाण असल्याचे कृषी सहाय्यक ललिता साळवे यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सांगितले. मूलस्थानी जल व्यवस्थापन केल्यास रब्बी ज्वारी उत्पादनात ३० ते ३५ टक्के वाढ होते. सुधारित वाण कोरडवाहू आणि बागायती क्षेत्रासाठी रब्बी ज्वारीचे शिफारस केलेले सुधारित किंवा संकरित वाण जमिनीच्या प्रकारानुसार वापरावेत, अशी संपुर्ण माहिती शेतकऱ्यांना रब्बी ज्वारी पिक प्रात्यक्षिक पाहणी कार्यक्रमात देण्यात आली .

# निधन वार्ता

## लक्ष्मीबाई करणेकर

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर



मराठवाडा विद्यापीठ येथील कर्मचारी लक्ष्मीबाई नरसिंग करणेकर यांचे ( वय 62 ) आज रोजी दि. 27 /2/2023 रात्री 11.35 वाजता अजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगी, एक मुलगा असा परिवार आहे. मंगळवारी त्यांच्या अंतिमविधी पडेगाव स्मशानभूमीत करण्यात आला.

## भावराव काटकर

**बाजार सावंगी :** येथील रहिवासी व जिल्हा परिषद आरोग्य



विभागातील सेवानिवृत्त एक्स-रे तज्ञ भावराव शाहूबा काटकर ( वय 75 ) यांचे अल्पशा आजाराने सोमवार दि. 27 फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले मुलगी नातवंड असा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी मंगळवारी सकाळी झाला. ते वारकरी सांप्रदायिक होते ग्रामपंचायत सदस्य पोपट काटकर यांचे ज्येष्ठ बंधू होत.

# जी-२० च्या शिष्टमंडळाची लेणी व बीबीका मकबऱ्याला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जी-२० परिषदेच्या शिष्टमंडळाने आज शहरातील प्राचीन ऐतिहासिक वारसा असलेल्या छत्रपती संभाजीनगर लेणी आणि बीबीका मकबऱ्याला भेट दिली. शिष्टमंडळात असणाऱ्या सर्व विदेशी महिला पाहुण्या हा वारसा पाहून अक्षरशः भारावून गेल्या. शिष्टमंडळ औरंगाबाद लेणीला भेट देणार असल्या कारणाने संपूर्ण लेणी परिसर हा सुशोभिकरणामुळे अधिकच सुंदर दिसत होता. तर लेणीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूने छान रांगोळी काढल्यामुळे रस्त्याचे सौंदर्य खुलले होते. तीन वातानुकूलित बसेसमधून सकाळीच लेणीच्या पायथ्याशी महिला पाहुण्यांचे आगमन झाल्यानंतर नऊवारी नेसलेल्या तरुणींनी त्यांच्यावर फुलांची उधळण करून त्यांना गुलाब पुष्प भेट दिले. लेणीपर्यंत जाण्यासाठी लाल कार्पेट अंथरलेले होते. पुरातत्व विभाग, जिल्हा व महानगरपालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांनीही त्यांचे स्वागत केले. मुख्य लेणीच्या परिसरात आल्यानंतर लेणीचे सौंदर्य पाहून सर्व महिला थक्क झाल्या. यावेळी उपस्थित गाईडने प्राचीन लेणीच्या प्रत्येक भागाची इंतभूत माहिती पाहुण्यांना दिली. हा प्राचीन वारसा पहिल्यानंतर अनेकांनी त्याचे कौतुक केले. औरंगाबादच्या लेण्यांचा समूह हा आसपासच्या जमिनीपासून ७० फूट उंचीवर असलेल्या दख्खन पठारामध्ये कोरलेल्या आहेत. येथे बौध्द धर्माला समर्पित एकूण १२ लेणी आहेत ज्या तीन



स्वतंत्र गटामध्ये विभाजित आहेत. पहिल्या गटात १ ते ५ पर्यंत दुसऱ्या गटात ६ ते ९ आणि तिसऱ्या गटात १० ते १२ लेणी आहेत. या लेण्या सुमारे तिसऱ्या ते सातव्या शतकात निर्माण केलेल्या आहेत. पहिल्या गटात लेणी क्र. १ ही अपूर्ण लेणी आहे ज्या मध्ये व्हरांडा आणि स्तंभ आहेत लेणी क्र. २ आणि ५ या समकालीन संरचनात्मक मंदिराप्रमाणे दिसतात जे शैलकृत उदाहरणांमध्ये दुर्मिळ आहेत. लेणी क्र. ३ ही पहिल्या गटातील सर्वात प्रमुख आणि सर्वात मोठी लेणी आहे, हे एक महाविहार आहे. ज्यामध्ये प्रदक्षिणापथा सोबतच गर्भगृह आहे. या वरील स्तंभांवर पर्णसंभार, मिथुन शिल्प आणि जातक कथा कोरलेल्या आहेत. लेणी क्र. ४ हे हिनयान काळातील एकमात्र चैत्यगृह आहे. दुसऱ्या गटातील लेणी ही पहिल्या गटाच्या उत्तर पूर्वेस सुमारे साधारणतः १ कि.मी. अंतरावर आहे. लेणी क्र. ६ अ आणि ७ विहार आहेत. जे तेथील विवरणत्मक शिल्पे आणि सुंदर प्रतिमांकरिता प्रसिध्द आहेत. लेणी क्र. ८ आणि ९ या अपूर्ण उत्खननामुळे आपल्याला लेणी निर्माण करण्याची प्रक्रिया माहीती होते. या गटातील लेणी प्रतिमा शिल्पांनी युक्त आहेत आणि औरंगाबाद लेण्यातील उत्कृष्ट उदाहरण आहेत. यात बोधीसत्व, अष्टमहाभय, अवलोकितेश्वर, पट-प्रज्ञा देवी सोबतच बोधिसत्व, हारिती पंचिका, नृत्य वादनच्या दृश्यांचे पटल, महापरिनिर्वाणाचे दृश्य इ. भरपूर अंकन केलेले आहेत. स्तंभावर पर्णसंभार आणि भौमितिक आकृत्यांचे सुंदर अंकन केले आहे. तिसऱ्या गटातील लेणी क्र. १० आणि १२ दुसऱ्या गटापासून थोडया अंतरावर उत्तरेकडे स्थित आहेत लेणी क्र. १० आणि ११ अर्धनिर्मित लेण्या आहेत तर लेणी क्र. १२ एक विहार आहे. औरंगाबाद लेणी पहिल्यानंतर शिष्टमंडळाने जवळच असणाऱ्या बीबी का मकबऱ्याला भेट दिली. या ठिकाणी त्यांचे स्वागत तुतारी व सनई चौघडयाच्या वादनाने अतिशय उत्साहात करण्यात आले. त्यांच्यावर फुलांची उधळण करण्यात आली. औरंगाबाद शहराच्या सौंदर्यात भर घालणारा बीबी का मकबरा पाहताना पाहुण्यांनी यावेळी आश्चर्य व्यक्त केले.

# सैनिकी शाळेसाठी ईट येथील विद्यार्थ्यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील भूम तालुक्यातीलजि. प. प्रशाला, ईट शाळेच्या यशात मानाचा तुरा. इयत्ता पाचवी सैनिकी शाळा प्रवेश परीक्षेत तब्बल 12 पैकी 10 विद्यार्थी पात्र. (जि.प.प्रशाला ईट चा पहिलाच सैनिकी शाळा प्रवेशासाठी जास्त विद्यार्थी बसवण्याचा प्रयत्न यशस्वी.)

गुणवंत विद्यार्थी

१) विराज सतीश हुंबे--१९५
२) आयुष अंकुश पवार--१९३
३) संस्कृती संतोष मेंढेकर--१८८
४) गौरव सोमेश्वर स्वामी १८०
५) कुमठेकर समर्थ संजय--१७४
६) रुद्र आबासाहेब वराळे--१६३
७) शिवराज समाधान डोके--१६३
८) रोहन रवींद्र हुंबे--१३७
९) अमोल हनुमंत थोरात--१२५
१०) राजनंदनी महादेव कांबळे--१२१

या विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन जि.प प्रशाला ईटचे शिक्षक सर्व श्री अंकुश पवार राहूल सरवदे व सत्यभामा हुरकुडे यांचे लाभले त्यामुळे त्यांचाही विशेष सत्कार सरपंच श्री . संजय आसलकर ,शाळा व्यवस्थापन समिती ईट व मुख्याध्यापक जि.प. प्रशाला ईटच्या मार्फत करण्यात आला.



वरील सर्व पात्र विद्यार्थ्यांचा ही सत्कार वरील मान्यवरांमार्फत करण्यात आला. या प्रसंगी प्रतापभैया देशमुख यांनी विवेकानंद वाचनालयाचे आजन्म सभासदत्त्व वरील सर्व विद्यार्थ्यांना दिले.

या प्रसंगी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. सोमेश्वर स्वामी, सयाजीराजे हुंबे , सुलतान मनियार व पालक उपस्थित होते.




# वन्य प्राण्यांच्या धुमाकुळाची बातमी प्रकाशित होताच वन विभागाने घेतली दखल

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** तालुक्यातील शेरोडी परिसरात काही दिवसापासून रानडुक्कर व नीलगाई यांनी मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला असून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे मक्का पिकांचे नुकसान होत असून त्यामुळे शेतकरी धास्तवले असून वनविभागाने बंदोबस्त करण्याची मागणी केली होती. ही बातमी




दैनिक आधुनिक केसरी न्यूज मध्ये प्रकाशित झाल्यानंतर वन विभागाकडून दखल घेत वनरक्षक ए.आर ठाकूर मॅडम यांनी मम्माराबाद परिसरात नुकसान झालेल्या पिकांची पाहणी करण्यात आली वनरक्षक ठाकूर मॅडम म्हणाल्या आम्ही प्राण्यांना पकडू शकत नाही परंतु आलेल्या पिकांचे नुकसान भरपाईचे फॉर्म भरून पंचनामे करू असे त्यांनी शेतकऱ्यांना सांगितले या प्रसंगी वन मजूर मालोदे कैसर शेख कौशल्याबाई वेताळ अफजल शेख अशेप शेख अनिस शेख अफसर शेख शब्बीर शेख आदी शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

# छत्रपती संभाजीनगर येथे पाच भावंडांसह बहिणीचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील चारठाणा येथील रहिवासी परंतु आज औरंगाबाद येथे स्थायिक झालेले देशपांडे चारठाणकर कुटुंबात 75 ते 93 वर्ष झालेल्या मंडळींचा त्यांच्या प्रति ऋण म्हणून त्यांच्या मुलं, मुली, सुना, नातवंड यांनी पाच भाऊ तर एक बहीण यांचा आनंदाचा अमृत महोत्सव व सहस्त्रचंद्र दर्शनांचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात सर्व नातलगांच्या उपस्थितीत औरंगाबाद येथे सिडको एन.1 भक्ती गणपती मंदिर या ठिकाणी संपन्न झाला. चारठाणा तालुका जिंतूर येथील रहिवासी असलेले परंतु आज नोकरी कामानिमीत्य औरंगाबाद येथे स्थायिक झालेले देशपांडे चारठाणकर कुटुंब व या कुटुंबांसाठी ज्यांनी अहोरात्र जिवांची रान करून त्यांच्या कुटुंबांसाठी झटले आज त्यांचे वय कोणाची 75 तर 93 वर्ष झाल्याने त्यांना वृद्धापकाळ असल्याने त्यांना एकटेपणा वाटूनये त्यामुळे त्यांचे मुले, मुली, सुना,जावाई, नातवंड यांनी त्यांचा



सहस्त्र दर्शन व अमृत महोत्सवांचा कार्यक्रम सिडको एन.1 मधील भक्ती गणपती मंदिरात दिनांक 26 /02 /2023 रोजी मोठ्या थाटात संपन्न करून त्यांची साखर,गुळ व नारळाने तुला करण्यात आली ते वयोवृद्ध चारठाणकर म्हणजे श्री प्रभाकर गणपतराव देशपांडे, सौ.सुलभा व बाळकृष्ण गणपतराव देशपांडे, सौ. सुनीता व सुधाकरराव गणपतराव देशपांडे,सौ. सुमती व अरविंदराव गणपतराव देशपांडे,सौ. विद्या व अशोकराव गणपतराव देशपांडे आणि त्यांच्या बहिणी श्रीमती वृंदा सुधाकरराव आडगावकर या सख्ख्या बहिण भावांचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थीतांना विभा धर्माधिकारी, सौ.अनुराधा श्रीपाद देशपांडे, सौ .रोहिणी सुधाकरराव सोनवटकर, यांनी आपले मनोगत व सत्कारमूर्ती विषयी आपलेपणा व्यक्त केला. तर या कार्यक्रमासाठी व विजय, विनोद,प्रमोद, प्रफुल्ल देशपांडे, आनंद, मनोज, मंगेश, प्रविण, प्रशांत, रोहिणी सोनवटकर, रंजना कुरुंदकर, सौ.मंजुषा औंढेकर,अपर्णा मानकेश्वर, प्रवीण देशपांडे, गणेश आडगावकर आदी व सर्व मुलं, मुली, सुना,जावाई,नातवंड, यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in